स्ना. २०१ शिं.१ दि ३/०१/१८ पान १५

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली प्लास्टिकमुक्त अभियानाची शपथ

बारामती - अभिनव उपक्रम आणि सामाजिक भान जपण्याचे धोरण तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय नेहमीच यशस्वीपणे राबवित आले आहे. यंदादेखील नववर्षाच्या उंबरठ्यावर पहिल्याच दिवशी म्हणजे १ जानेवारी रोजी महाविद्यालयाने आणखी एका नव्या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक भान जपत प्लास्टिक मुक्त अभियान सुरू केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सकाळी ११.३० वाजता जीवराज सभागृहासमोर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन या अभियानाला सुरूवात केली. राष्ट्रगीतानंतर विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी प्लास्टिक मुक्त परिसर करण्याची शपथ याप्रसंगी घेतली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी या अभिनव उपक्रमाचे महत्व आणि आजची या अभियानाची गरज आपल्या प्रास्ताविकात मांडली. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या प्लास्टिक मुक्तीची जाणीव संपूर्ण परिसरात आणि समाजात विद्यार्थी पूर्ण उर्जेने निर्माण करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःच्या आयुष्यात प्लास्टिकचा वापर न करण्यासोबतच समाजातील आणि परिसरातील इतर घटकांना प्लास्टिक वापरापासून परावृत्त करण्याचा संकल्प केला. शिवाय परिसरामध्ये प्लास्टिक वस्तू, पिशव्या विक्री आणि वापर न करण्याची विनंती देखील केली. सामाजिकतेचे भान जपणाऱ्या या अभिनव कार्यक्रमात प्राचार्यांसोबतच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर , प्रा. ज्योतीराम घाडगे, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रकाश मेहेर, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आभासात जगण्यापेक्षा वास्तवात जगणे महत्त्वाचे

बारामती - घराघरांमधला एकमेकांमध्ये होणारा संवाद सोशल मिडीयामुळे संपत चालला आहे. सोशल मिडीयामध्ये असणे आवश्यक आहे. परंतु त्यामध्येच रमणें बरोबर नाही. वास्तवामध्ये तुम्हाला कोणीतरी समजून घेतय हेच तुम्ही विसरताय. या आभासी दुनियेतील घडणारी प्रत्येक गोष्ट आपण खरी समजतो. आभासी जग हे भुलभूल्लेय्या आहे. आपली स्वप्न पूर्ण करायची असतील तर चांगले शिक्षण घेणे आवश्यक आहे असे उद्गार सावित्रीबाई फुले जयंती उत्सवानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाद्वारे आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुक्त पत्रकार अश्विनी सातव-डोके यांनी काढले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून विद्यार्थी हे राजदूत आहेत. त्यांनी शिक्षणाबरोबरच जीवन शिक्षण घेणे आवश्यक आहे. आपण काय शिकतो हे समजून घेणे जेवढेच महत्त्ववाचे आहे तेवढेच बाहेरचे जग वाचणे गरजेचे आहे. माणूस म्हणून आपल्या भोवतालच्या प्रतिक्रिया समजून घेतल्या पाहिजेत. या कार्यक्रम प्रसंगी स्वागत व प्रास्ताविक प्रा. वैशाली पोळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्मिता मंगुडकर यांनी केले तर आभार प्रा. ललिता कारकुड यांनी केले. या कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

दि. ४/१/२०१८ पान नं. २

# दि. ५ पासून तु.च. महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

बारामती - येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. ५ व ६ जानेवारी २०१८ रोजी न्यु होरायझन्स इन अकौटींग, टॅक्सेशन अँड मॅनेजमेंट या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या परिषदेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.एन.एस. उमराणी यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेमध्ये अर्थक्रांतीचे प्रणेते श्री. अनिल बोकील, डॉ. जी.आर. कृष्णमूर्ती विशेष वित्त सल्लागार, डॉ. आर.जी. अलागी, संचालक बसवेश्वर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, बागलकोट, डॉ. परेश शहा इंडीयन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद तसेच डॉ.ए. एम. गुरव अधिष्ठाता, वाणिज्य विद्या शाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर असे अनेक ख्यातनाम तज्ञ उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेमध्ये डॉ.आर.जी. अलागी यांचे इनोव्हेटिव्ह स्ट्रॅटेजीज इन प्रोफेशनल अकौटींग डेव्हलपमेंट, अनिल बोकील यांचे न्यु टॅक्स रिफॉर्म्स-जीएसटी, डॉ. जी. आर. कृष्णमुर्ती यांचे न्यू चॅलेंजेस अँड इम्प्लीकेशन्स इन टॅक्स प्रॅक्टिस इन इंडिया, डॉ. परेश शहा यांचे फॉरेन्सिक अकौटींग अँज अ टूल ऑफ फ्रॉड अँड करप्शन डिटेक्शन, डॉ.ए.एम. गुरव यांचे रिसेंट ट्रेंड्स इन मॅनेजमेंट इन चेंजिंग ग्लोबल एन्व्हायर्नमेंट इ. विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने होणार आहेत. या परिषदेत उद्योजक, व्यापारी, चार्टर्ड अकौटंट, व्यावसायिक, संशोधक, विविध राज्यातील तज्ञ प्राध्यापक सहभागी होत असून विविध विषयांवरील १०० शोध निबंधांचे सादरीकरण करणार आहेत. यासाठी सह-संयोजक, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. प्रकाश मेहेर व ऑर्गनायझेशन सेक्रेटरी डॉ. जनार्दन पवार यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत अशी माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली. परिषद यशस्वी होण्यासाठी केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री. अरहतदास शहा सराफ, मा.श्री. जवाहर शाह सचिव यांनी या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

---

लोकमत पुणे, बुधवार, दि. ३ जानेवारी २०१८

# दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. ५ आणि ६ जानेवारी 'न्यू होरायझन्स इन अकौंटिंग, टॅक्सेशन अँड मॅनेजमेंट' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेमध्ये अर्थक्रांतीचे प्रणेते अनिल बोकील, डॉ. जी. आर. कृष्णमूर्ती विशेष वित्त सल्लागार, डॉ. आर. जी. अलागी, संचालक बसवेश्वर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, बागलकोट, डॉ. परेश शहा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद तसेच डॉ. ए. एम. गुरव अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर असे अनेक ख्यातनाम तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेमध्ये डॉ. आर. जी. अलागी यांचे इनोव्हेटिव्ह स्ट्रॅटेजीज इन प्रोफेशनल अकौंटिंग डेव्हलपमेंट, अनिल बोकील यांचे न्यू टॅक्स रिफॉर्म्स - जीएसटी, डॉ. जी. आर. कृष्णमूर्ती यांचे न्यू चॅलेंजेस अँड इम्प्लिकेशन्स इन टॅक्स प्रॅक्टिस इन इंडिया, डॉ. परेश शहा यांचे फॉरेन्सिक अकौंटिंग अँज अ टूल ऑफ फ्रॉड अँड करप्शन डिटेक्शन, डॉ. ए. एम. गुरव यांचे रिसेंट ट्रेंड्स इन मॅनेजमेंट इन चेंजिंग ग्लोबल एन्व्हायर्नमेंट आदी विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने होणार आहेत.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

# आभासी जग हा भूलभुलैया

## अश्विनी सातव-डोके : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : घराघरांमधला एकमेकांमध्ये होणारा संवाद सोशल मीडियामुळे संपत चालला आहे. वास्तवामध्ये तुम्हाला कोणीतरी समजून घेतंय, हेच तुम्ही विसरताय. या आभासी दुनियेतील घडणारी प्रत्येक गोष्ट आपण खरी समजतो. आभासी जग हा भूलभुलैया आहे. आपली स्वप्नं पूर्ण करायची असतील तर चांगले शिक्षण घेणे आवश्यक आहे, असे मत अश्विनी सातव-डोके यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले जयंती उत्सवानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाद्वारे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या वेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अश्विनी सातव-डोके यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून विद्यार्थी हे 'राजदूत' आहेत. त्यांनी शिक्षणाबरोबरच 'जीवन शिक्षण' घेणे आवश्यक आहे. आपण काय शिकतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. तेवढेच बाहेरचे जग वाचणे गरजेचे आहे. माणूस म्हणून आपल्या भोवतालच्या प्रतिक्रिया समजून घेतल्या पाहिजेत. स्वागत व प्रास्ताविक प्रा. वैशाली पोळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्मिता मंगुडकर यांनी केले, तर आभार प्रा. ललिता कारकुड यांनी केले. शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# मुलींनी स्वप्नांना गवसणी घालावी-शीतल महाजन

बारामती:- मुलींनी आपल्या स्वप्नांना गवसणी घालण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी लढा द्यावा. येणाऱ्या संकटांना निर्भीडपणे प्रतिकार करण्याची क्षमता आपल्यात हवी. आपली आवड ओळखून मुलींनी ध्येय निश्चित करावे, असे प्रतिपादन पहिल्या भारतीय महिला स्काय जंपिंग डायव्हर पद्मश्री शीतल महाजन यांनी केले.

पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निर्भय कन्या कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी स्मार्ट गर्ल-सेफ गर्ल या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकरर होते. यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक डॉ.संदीप पखाले, उपप्राचार्य डॉ.शिवाजी साठे, डॉ.अविनाश जगताप, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते.

> जगातील पहिली जंप करणारी भारतीय महिला म्हणून मला खूप संघर्ष करावा लागला. मुलींनी आपल्या स्वप्नांना गवसणी घालण्यासाठी लढा द्यावा. तोही पूर्ण ताकदीनिशी द्यावा. मलाही घर सोडावे लागले. पण कुटुंबाची मोलाची साथ मिळाली. -**शीतल महाजन**,जंप डायव्हर

अभय अभियान संस्थेचे संस्थापक सदस्य मिलिंद चव्हाण यांनी पितृसत्ताक समाजव्यवस्था आणि स्त्रियांची सुरक्षितता या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. पितृसत्ताकर समाजव्यवस्थेने स्त्रियांना उद्देशून पूर्वीपासून बाईमाणूस संबोधले. परंतू स्त्रीला माणूसपणाचा दर्जाच दिला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अतिरिक्त पोलिस अधिक्षक डॉ.संदीप पखाले यांनी सुरक्षित स्त्री या विषयावर मुलींना संबोधित केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी मुलींनी स्वत:ला ओळखावे व स्वत:ची क्षमता सिद्ध करावी, असे आवाहन केले. निर्भया पथकातील सदस्य शिवरकर व गायकवाड यांनी स्त्रीसंरक्षण या विषयावर मुलींशी संवाद साधला.

डॉ.सीमा नाईक-गोसावी यांनी प्रास्ताविक केले. सारिका कळसकर, अमृता घोळवे, ऋतुजा घोंगडे, तृप्ती खंडले या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले. डॉ.समाधान पाटील यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा. प्राचार्य साहेब,

सकाळ विद्येच्या प्रांगणात
पुणे, गुरुवार
४ जानेवारी २०१८

# 'टीसी'ची सर्व क्षेत्रांत मोठी प्रगती

## नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे यांचे गौरवोद्गार; महाविद्यालयास ११ पुरस्कार

बारामती, ता. ३ : ''येथील विद्यार्थी व प्राध्यापकांसह विश्वस्तांनी गेल्या अनेक वर्षांत केलेल्या कष्टांमुळेच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. सर्व क्षेत्रांत महाविद्यालयाची होणारी प्रगती नेत्रदीपक आहे,'' असे गौरवोद्गार बारामतीच्या नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे यांनी काढले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित विशेष गौरव सोहळ्यात कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून तावरे बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ प्रमुख अतिथी तर संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर अध्यक्षस्थानी होते. माजी नगराध्यक्ष शिवाजी कदम, संस्थेचे सदस्य राजकुमार वाघोलीकर, संस्थेचे खजिनदार सुनील लेंगरेकर, मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर उपस्थित होते.



**बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास पर्ल संस्थेच्या वतीने अकरा पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. त्यानिमित्त संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर व इतर मान्यवरांचा सत्कार करताना नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, माजी नगराध्यक्ष शिवाजी कदम व इतर मान्यवर.**

या वेळी जवाहर वाघोलीकर म्हणाले, ''महाविद्यालयास नॅककडून 'अ प्लस' हा दर्जा तसेच पर्ल फाउंडेशनचे ११ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यानिमित्त या गौरव समारंभाचे आयोजन केले गेले. २०१७ हे वर्ष संस्थेच्या वाटचालीत महत्त्वाचे वर्ष ठरले असून, आगामी काळातही संस्था अशीच प्रगती करेल.''

शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी कार्यरत पर्ल फाउंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांना नुकताच प्रदान केला गेला. याशिवाय पर्ल फाउंडेशनकडून महाविद्यालयास या पुरस्कारासोबतच सर्वोत्कृष्ट नॅक मानांकित ए प्लस दर्जा मिळाल्याबद्दल तसेच सर्वोत्कृष्ट पारंपरिक ऊर्जास्रोत वापरणारी संस्था पुरस्कार, सर्वोत्कृष्ट हरित महाविद्यालय परिसर हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. 'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी कल्याण मंडळ समन्वयक' हा पुरस्कार उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांना, 'सर्वोत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालकाचा पुरस्कार' गौतम जाधव यांना, 'सर्वोत्कृष्ट दत्तक गाव योजना राबविणाऱ्या संस्थेचा पुरस्कार' व्ही. व्ही. कर्डिले यांना, तर डॉ. भगवान माळी यांना 'सर्वोत्कृष्ट एनएसएस समन्वयका'चा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांना सर्वोकृष्ट प्रशासकाचा पुरस्कार देण्यात आला. 'सूक्ष्मजीवशास्त्रातील सर्वोत्कृष्ट सहयोगी प्राध्यापकाचा पुरस्कार' उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे यांना, 'वनस्पतिशास्त्रातील सर्वोत्कृष्ट सहायक प्राध्यापकाचा पुरस्कार' उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे यांना देण्यात आला. प्रा. संजय शेंडे आणि प्रा. मेघा बडवे यांनी सूत्रसंचालन केले.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

A35
4/1/18

लोकमत पुणे, गुरुवार, दि. ४ जानेवारी २०१८

# आभासी जग हा भूलभुलैया

## अश्विनी सातव-डोके : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अश्विनी सातव-डोके यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

बारामती : घराघरांमधला एकमेकांमध्ये होणारा संवाद सोशल मीडियामुळे संपत चालला आहे. वास्तवामध्ये तुम्हाला कोणीतरी समजून घेतंय, हेच तुम्ही विसरताय. या आभासी दुनियेतील घडणारी प्रत्येक गोष्ट आपण खरी समजतो. आभासी जग हा भूलभुलैया आहे. आपली स्वप्नं पूर्ण करायची असतील तर चांगले शिक्षण घेणे आवश्यक आहे, असे मत अश्विनी सातव-डोके यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले जयंती उत्सवानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाद्वारे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या वेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून विद्यार्थी हे 'राजदूत' आहेत. त्यांनी शिक्षणाबरोबरच 'जीवन शिक्षण' घेणे आवश्यक आहे. आपण काय शिकतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. तेवढेच बाहेरचे जग वाचणे गरजेचे आहे. माणूस म्हणून आपल्या भोवतालच्या प्रतिक्रिया समजून घेतल्या पाहिजेत. स्वागत व प्रास्ताविक प्रा. वैशाली पोळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्मिता मंगुडकर यांनी केले, तर आभार प्रा. ललिता कारकुड यांनी केले. शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# बारामतीतील शाळा, महाविद्यालये बंद

बारामती : प्रतिनिधी

महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ३) बारामती शहर व तालुक्यातील शाळा-महाविद्यालये बंद राहिली. यासंबंधीची पूर्वसूचना मिळालेली नसल्याने विद्यार्थी व पालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.

महाराष्ट्र बंदचा निर्णयानंतर शाळा सुरूच राहणार असल्याचे सुरुवातीला सांगण्यात आले होते. परंतु त्यानंतर बुधवारच्या परिस्थितीचा विचार करून एसटी महामंडळाने गाड्या रस्त्यावर न आणण्याचा निर्णय घेतला. शिवाय खासगी बस, वाहनांनेही रस्त्यावर उतरविली नाहीत. त्यामुळे शाळा-महाविद्यालयांनी अचानक सुटी जाहीर केली.

बस व अन्य वाहनांची व्यवस्था नसल्याने पालकांनी स्वतःची गाडी बाहेर काढत पाल्याला शाळेपर्यंत पोहोचविले. तेथे गेल्यावर मात्र शाळा बंद असल्याचे समजले. परिणामी अनेक पालकांवर हेलपाटा मारण्याची वेळ आली. ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी शाळेसाठी सायकलवर सकाळीच आले होते. परंतु शाळेजवळ पोहोचल्यावर सुटी जाहीर झाल्याचे त्यांना समजले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

लोकमत पुणे, गुरुवार, दि. ४ जानेवारी २०१८

# आभासी जग हा भूलभुलैया

## अश्विनी सातव-डोके : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : घराघरांमधला एकमेकांमध्ये होणारा संवाद सोशल मीडियामुळे संपत चालला आहे. वास्तवामध्ये तुम्हाला कोणीतरी समजून घेतंय, हेच तुम्ही विसरताय. या आभासी दुनियेतील घडणारी प्रत्येक गोष्ट आपण खरी समजतो. आभासी जग हा भूलभुलैया आहे. आपली स्वप्नं पूर्ण करायची असतील तर चांगले शिक्षण घेणे आवश्यक आहे, असे मत अश्विनी सातव-डोके यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले जयंती उत्सवानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाद्वारे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या वेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून विद्यार्थी हे 'राजदूत' आहेत. त्यांनी शिक्षणाबरोबरच 'जीवन शिक्षण' घेणे आवश्यक आहे. आपण काय शिकतो हे समजून घेणे महत्वाचे आहे. तेवढेच बाहेरचे जग वाचणे गरजेचे आहे. माणूस म्हणून आपल्या भोवतालच्या प्रतिक्रिया समजून घेतल्या पाहिजेत. स्वागत व प्रास्ताविक प्रा. वैशाली पोळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्मिता मंगुडकर यांनी केले, तर आभार प्रा. ललिता कारकुड यांनी केले. शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अश्विनी सातव-डोके यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

# बारामतीतील शाळा, महाविद्यालये बंद

**बारामती : प्रतिनिधी**

महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ३) बारामती शहर व तालुक्यातील शाळा-महाविद्यालये बंद राहिली. यासंबंधीची पूर्वसूचना मिळालेली नसल्याने विद्यार्थी व पालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.

महाराष्ट्र बंदचा निर्णयानंतर शाळा सुरूच राहणार असल्याचे सुरुवातीला सांगण्यात आले होते. परंतु त्यानंतर बुधवारच्या परिस्थितीचा विचार करून एसटी महामंडळाने गाड्या रस्त्यावर न आणण्याचा निर्णय घेतला. शिवाय खासगी बस, वाहनांनेही रस्त्यावर उतरविली नाहीत. त्यामुळे शाळा-महाविद्यालयांनी अचानक सुटी जाहीर केली.

बस व अन्य वाहनांची व्यवस्था नसल्याने पालकांनी स्वतःची गाडी बाहेर काढत पाल्याला शाळेपर्यंत पोहोचविले. तेथे गेल्यावर मात्र शाळा बंद असल्याचे समजले. परिणामी अनेक पालकांवर हेलपाटा मारण्याची वेळ आली. ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी शाळेसाठी सायकलवर सकाळीच आले होते. परंतु शाळेजवळ पोहोचल्यावर सुटी जाहीर झाल्याचे त्यांना समजले.

प्रा० प्राचार्य सा०

सकाळ
पुणे, गुरुवार
४ जानेवारी २०१८
४

# ‘टीसी’ची सर्व क्षेत्रांत मोठी प्रगती

## नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे यांचे गौरवोद्‌गार; महाविद्यालयास ११ पुरस्कार

**बारामती, ता. ३ :** “येथील विद्यार्थी व प्राध्यापकांसह विश्वस्तांनी गेल्या अनेक वर्षांत केलेल्या कष्टांमुळेच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. सर्व क्षेत्रांत महाविद्यालयाची होणारी प्रगती नेत्रदीपक आहे,” असे गौरवोद्‌गार बारामतीच्या नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे यांनी काढले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित विशेष गौरव सोहळ्यात कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून तावरे बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ प्रमुख अतिथी तर संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर अध्यक्षस्थानी होते. माजी नगराध्यक्ष शिवाजी कदम, संस्थेचे सदस्य राजकुमार वाघोलीकर, संस्थेचे खजिनदार सुनील लेंगरेकर, मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर उपस्थित होते.



**बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास पर्ल संस्थेच्या वतीने अकरा पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. त्यानिमित्त संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर व इतर मान्यवरांचा सत्कार करताना नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, माजी नगराध्यक्ष शिवाजी कदम व इतर मान्यवर.**

या वेळी जवाहर वाघोलीकर म्हणाले, “महाविद्यालयास नॅककडून ‘अ प्लस’ हा दर्जा तसेच पर्ल फाउंडेशनचे ११ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यानिमित्त या गौरव समारंभाचे आयोजन केले गेले. २०१७ हे वर्ष संस्थेच्या वाटचालीत महत्त्वाचे वर्ष ठरले असून, आगामी काळातही संस्था अशीच प्रगती करेल.”

शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी कार्यरत पर्ल फाउंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांना नुकताच प्रदान केला गेला. याशिवाय पर्ल फाउंडेशनकडून महाविद्यालयास या पुरस्कारासोबतच सर्वोत्कृष्ट नॅक मानांकित ए प्लस दर्जा मिळाल्याबद्दल तसेच सर्वोत्कृष्ट पारंपरिक ऊर्जास्रोत वापरणारी संस्था पुरस्कार, सर्वोत्कृष्ट हरित महाविद्यालय परिसर हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ‘सर्वोत्कृष्ट विद्यार्थी कल्याण मंडळ समन्वयक’ हा पुरस्कार उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांना, ‘सर्वोत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालकाचा पुरस्कार’ गौतम जाधव यांना, ‘सर्वोत्कृष्ट दत्तक गाव योजना राबविणाऱ्या संस्थेचा पुरस्कार’ व्ही. व्ही. कर्डिले यांना, तर डॉ. भगवान माळी यांना ‘सर्वोत्कृष्ट एनएसएस समन्वयका’चा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांना सर्वोकृष्ट प्रशासकाचा पुरस्कार देण्यात आला. ‘सूक्ष्मजीवशास्त्रातील सर्वोत्कृष्ट सहयोगी प्राध्यापकाचा पुरस्कार’ उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे यांना, ‘वनस्पतिशास्त्रातील सर्वोत्कृष्ट सहायक प्राध्यापकाचा पुरस्कार’ उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे यांना देण्यात आला. प्रा. संजय शेंडे आणि प्रा. मेघा बडवे यांनी सूत्रसंचालन केले.

A35
4/5.1.18

# वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चि

बारामती:– अकाउंटन्सी हा कोणत्याही उद्योग आणि व्यापाराचा कणा असतो. याचा प्रभावी वापर करून करनिर्धारणामध्ये आधुनिकतेचा वापर केल्यास व्यापार आणि राष्ट्रसमृद्धी साधता येईल. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी अपार कष्टाची तयारी



ठेवावी असे मत चार्टर्ड अकाउंटंट ऋता चितळे यांनी व्यक्त केले.

तु.च.महाविद्यालयात दि.५ व ६ रोजी झालेल्या न्यू होरायझन्स इन अकाउंटिंग टॅक्सेशन ॲण्ड मॅनेजमेंट या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर होते. डॉ.जे.आर. कृष्णमुर्ती, मंगळूर, एम्स बारामतीचे संचालक डॉ.एम.ए.लाहोरी आदी उपस्थित होते.

चितळे पुढे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी नेहमीच आशावादी राहिले पाहिजे. स्वत:मध्ये असलेला विश्वास अधिक वृद्धींगत केला पाहिजे. भविष्यातील स्वप्ने पाहताना ती स्वप्ने वास्तववादी असतील याचे भान देखील राखले पाहिजे. अध्यक्षीय मनोगतात डॉ.मुरूमकर म्हणाले, शेती व्यवसायाला आपण बळ देणे गरजेचे आहे. कारण त्यामुळेच भविष्यात उद्योगवाढ शक्य होईल, तसेच त्यामुळे अर्थव्यवस्थेला देखील भरीव चालना मिळेल. डिजीटल इंडियाच्या या युगात आधुनिकतेसोबतच आपले भारतीयत्व प्रत्येकाने जपले पाहिजे. वाणिज्य शाखेत कुरियर करताना विद्यार्थ्यांना या परिषदेचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समारोप समारंभाच्या सुरूवातीला परिषदेचे संयोजक प्रा. प्रकाश मेहेर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, तर संयोजन सचिव डॉ.जनार्दन पवार यांनी दोन दिवसांच्या परिषदेचा आढावा घेतला. सूत्रसंचालन प्रा. योगिनी मुळे यांनी केले तर प्रा.विवेक बळे यांनी आभार मानले. या परिषदेमध्ये संपूर्ण देशभरातून ११९ प्राध्यापक, संशोधक आणि १७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी ९९ परिषद आयोजनासाठी वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

साप्ताहिक रणशिंग
दि. ११/

## तु.च. महाविद्यालयात विवाहपूर्व समुपदेशन कार्यशाळा संपन्न

बारामती - मानसशास्त्र विभाग व सकाळ प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने विवाहपूर्व मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी पुणे येथील सौ. स्मिता जोशी व डॉ. सागर पाठक व त्यांचे सहकारी हे उपस्थित होते. उद्घाटक म्हणून संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री. मिलिंद शहा (वाघोलीकर) व त्यांच्या पत्नी सौ. संगिता शहा (वाघोलीकर) ,तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व कार्यक्रमाचे संयोजक डॉ. विजयकुमार शिंदे मानसशास्त्र विभागप्रमुख उपस्थित होते. या कार्यशाळेत एकूण ४०० मुला-मुलींनी सहभाग नोंदवला. सौ. स्मिता जोशी व डॉ. सागर पाठक यांनी जोडीदाराची निवड, सहजीवन, तरूण-तरूणींमधील लैंगिक सहजीवन, मानसशास्त्रीय घटकांचे महत्व, आवडी-निवडी, घटस्फोट, प्रश्न-उत्तरे, विवाहोत्तर समस्या, निरोगी विवाह इ. विषयी बहुमोल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सहभागी विद्यार्थ्यांना पती, पत्नी, आई, वडील, कुटुंबातील इतर सदस्य इ. भूमिका करावयास सांगून या कार्यशाळेचे महत्व पटवून देण्यात आले. या कार्यशाळेचा भविष्यात जोडीदार निवडीचा उपयोग होईल असे मत अनेक विद्यार्थ्यांनी मांडले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु. फातिमा पठाण व मच्छिंद्र साळुंखे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. गणेश ढमे यांनी मानले.

दै. रणशिंग दि. ११/१/२०१८ पान १६

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात वाणिज्य विषयक राष्ट्रीय परिषद संपन्न

बारामती - अकौंटंसी हा कोणत्याही उद्योग आणि व्यापाराचा कणा असतो. याचा प्रभावी वापर करून कर निर्धारणामध्ये आधुनिकतेचा वापर केल्यास व्यापार आणि राष्ट्रसमृद्धी साधता येईल. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी अपार कष्टाची तयारी ठेवावी असे मत चार्टर्ड अकौंटंट ऋता चितळे, सचिव डब्ल्यूआय आरसी, आयसीएआय, पुणे यांनी मांडले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये दि. ५ व ६ जानेवारी रोजी झालेल्या या न्यू होरायझन्स इन अकौंटिंग, टॅक्सेशन एन्ड मॅनेजमेंटय या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप कार्यक्रमाप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर हे होते. डॉ.जे.आर. कृष्णमूर्ती, मॅंगलोर, एम्स बारामतीचे संचालक डॉ.एम.ए.लाहोरी आदी मान्यवर उपस्थित होते. त्या पुढे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी नेहमीच आशावादी राहिले पाहिजे. स्वत:मध्ये असलेला विश्वास अधिक वृद्धींगत केला पाहिजे. भविष्यातील स्वप्ने पाहताना ती स्वप्ने वास्तववादी असतील याचे भान देखील राखले पाहिजे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी या परिषदेच्या आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केला. शेती व्यवसायाला आपण बळ देणे गरजेचे आहे कारण त्यामुळेच भविष्यात उद्योगवाढ शक्य होईल तसेच त्यामुळे अर्थव्यवस्थेला देखील भरीव चालना मिळेल. डीजीटल इंडीयाच्या या युगात आधुनिकतेसोबतच आपले भारतीयत्व प्रत्येकाने जपले पाहिजे. वाणिज्य शाखेत करीयर करताना विद्यार्थ्यांना या परिषदेचा नक्कीच फायदा होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

समारोप समारंभाच्या सुरुवातीला परिषदेचे संयोजक प्रा.प्रकाश मेहेर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले तर संयोजन सचिव डॉ.जनार्दन पवार यांनी दोन दिवसाच्या परिषदेचा आढावा घेतला. सूत्रसंचालन प्रा.योगीनी मुळे यांनी केले. तर आभार प्रा.विवेक बळे यांनी मानले. या परिषदेमध्ये संपूर्ण देशभरातून ११९ प्राध्यापक, संशोधक आणि १७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी ९९ संशोधन निबंधाचे वाचन करण्यात आले. परिषद यशस्वी आयोजनासाठी वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. याबद्दल संस्थेचे सचिव जवाहर शहा (वाघोलीकर) यांनी समाधान व्यक्त केले.

दै. [illegible] दि. ११/१/२०१८ पान ४

# हिशेबशास्त्रामध्ये जबाबदारीची जाणीव असावी

बारामती - येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागामार्फत न्यु होरायझन्स इन अकौंटिंग, टॅक्सेशन अँड मॅनेजमेंट या विषयावर दोन दिवसांचे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. उमराणी एन.एस. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विकास शहा (लेंगरेकर) होते. याप्रसंगी डॉ. उमराणी म्हणाले की, अकौंटन्सी हे शास्त्र आहे. त्याचा उपयोग समाजासाठी योग्य पद्धतीने केला गेला पाहिजे. बँका, शिक्षण संस्था, सामाजिक आस्थापना यामध्ये सुधारित हिशेब पद्धती वापरली गेली पाहिजे न वापरल्यामुळे अनेक अफरातफरी, घोटाळे उघडकीस आले आहेत. त्यामधून समाजाचे अपरिमित नुकसान झाले आहे. अकौंटन्सीबरोबर अकौंटॅबिलीटी महत्त्वाची आहे. जागतिक स्तरावर असणाऱ्या हिशेब पद्धतीचा उपयोग भारतीय उद्योग व्यवसायांमध्ये केला गेला पाहिजे. कर लोकांना भरणे आवडत नाही परंतु या करामधूनच वीज, पाणी, रस्ते, संदेशवहन, संरक्षणासाठीचा खर्च सरकारला उपलब्ध होतो. देशहिताचा विचार करून करदात्याने आदर्श करदाता झाले पाहिजे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सदस्य, विकास शहा (लेंगरेकर) यांनी भूषविले. यावेळी यांनी, या राष्ट्रीय परिषदेमुळे हिशेब, अंकेक्षण व व्यवस्थापन यावर सखोल चर्चा होईल व त्याचा फायदा समाज, संशोधक, विद्यार्थी यांना होईल ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर म्हणाले की, आर्थिक क्षेत्रामध्ये जागतिकीकरणा बरोबर खूप मोठे बदल होत आहेत. सरकारने स्टार्टअप, मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र या प्रकारच्या योजना [illegible] केलेल्या आहेत. चलनाच्या बाबतीतही प्लास्टीक करन्सी लोक वापरत आहेत. या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये अकौंटिंग, टॅक्सेशन अँड मॅनेजमेंट या विषयावर विस्तृत चर्चा व्हावी व ती उद्योग, व्यवसाय, वाणिज्य व व्यापारी व करदीते यांच्यापर्यंत पोहचवावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.प्रकाश मेहेर यांनी केले तर आभार डॉ. जनार्दन पवार यांनी मानले. या उद्घाटनप्रसंगी डॉ. जी.आर. कृष्णमुर्ती विशेष वित्त सल्लागार, डॉ. आर.जी. अलागी, संचालक बसवेश्वर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट. बागलकोट [illegible]

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

५२/[illegible]

दै. पुण्य नगरी दि २४/१/२०१८ पान ६

# ‘अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करावे’

**। बारामती : प्रतिनिधी**

‘प्रत्येकाच्या मनात एक साहित्यिक दडलेला असतो. विद्यार्थ्यांनी डोळे उघडे ठेवून अनुभव घ्यावा. जे-जे सुचेल ते लिहावे. अनुभव संवेदनशीलतेने टीपावा. आलेल्या अनुभवाला नितळ मनाने स्वीकारावे. अंतर्बाह्य हलविणाऱ्या अनुभवाचे तार्किकदृष्ट्या विश्लेषण करावे. लेखकाने अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करावे,’ असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकांकिका लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना कटके म्हणाले की, ‘भाषेच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. वाङ्मयाच्या अभ्यासाकडे वेगळ्या पद्धतीने बघितले पाहिजे, चित्रपटनिर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक या क्षेत्रात मी कोठे आहे? असा प्रश्न विद्यार्थ्यांनी स्वतःला विचारला पाहिजे. भाषेच्या विद्यार्थ्यांनी मरगळ झटकून स्वतःच्या पायावर उभे राहावे. काळाबरोबर फक्त जागे होण्याची गरज आहे.’ याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. समाधान पाटील, डॉ. रामचंद्र सपकाळ, प्रा. भीमराव तोरणे उपस्थित होते. चौथा पर्याय, दुभंगून जाता जाता इ. स्वलिखित एकांकिकांच्या आधारे त्यांनी एकांकिका लेखनाचे तंत्र व आशयसूत्र याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून एकांकिका लेखनाचे प्रात्यक्षिक करवून घेतले.

मराठी विभागप्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले.

दै. प्रभात दि. २२/०१/२०२५ पान ३

# अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करा

## बारामती येथे नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांचे लेखकांना आवाहन

**बारामती, दि. २१ (प्रतिनिधी)** - प्रत्येकाच्या मनात एक साहित्यिक दडलेला असतो. विद्यार्थ्यांनी डोळे उघडे ठेवून अनुभव घ्यावा. जे - जे सुचेल ते लिहावे. अनुभव संवेदनशीलतेने टिपावा. आलेल्या अनुभवाला नितळ मनाने स्वीकारावे. अंतर्बाह्य हलविणाऱ्या अनुभवाचे तार्किकदृष्ट्या विश्लेषण करावे. लेखकाने अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करावे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकांकिका लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, भाषेच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. वाङमयाच्या अभ्यासाकडे वेगळ्या पद्धतीने बघितले पाहिजे. चित्रपटनिर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथालेखक या क्षेत्रात मी कोठे आहे? असा प्रश्न विद्यार्थ्यांनी स्वत:ला विचारला पाहिजे. भाषेच्या विद्यार्थ्यांनी मरगळ झटकून स्वत:च्या पायावर उभे रहावे. काळाबरोबर फक्त जागे होण्याची गरज आहे.

एकांकिका साहित्य प्रकाराचे वेगळेपण सांगताना नाट्यदिग्दर्शक विजय कटके म्हणाले, मोजक्या शब्दांत व मर्यादित वेळेत एकांकिकेची मांडणी करावी लागते. एकांकिकेसाठी एकच विषय, ठिकाणाचे बंधन पाळण्याची गरज नाही. बंधनांमुळे विचारावर मर्यादा येते. रंगमंचावरील बदलाचे स्वातंत्र्यही घेतले पाहिजे. दिग्दर्शक हा कॅप्टन व कमांडर असावा. कथावस्तू, कथेची मांडणी, प्रादेशिक वैशिष्ट्ये, कथेची भाषा, दृष्यात्मकता, नेपथ्य, संगीत संयोजन, संवाद, रंगभूषा, वेशभूषा, आर्थिक गणित आदि घटकांवर अतिशय बहुमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. समाधान पाटील, डॉ. रामचंद्र सपकाळ, प्रा. भीमराव तोरणे उपस्थित होते.

चौथा पर्याय, दुभंगून जाता जाता इ. स्वलिखित एकांकिकांच्या आधारे त्यांनी एकांकिका लेखनाचे तंत्र व आशयसूत्र याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून एकांकिकालेखनाचे प्रात्यक्षिक करवून घेतले. मराठी विभागप्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले. विविध विभागातील ५५ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला. संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

माय पुणे जिल्हा दक्षिण ५ पुढारी | पुणे, रविवार २१ जानेवारी २०१८

# अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करावे

## नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांचा लेखकांना सल्ला

**बारामती : प्रतिनिधी**

लेखकाने अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करावे अशी अपेक्षा नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांनी व्यक्त केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकांकिका लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेचे उदघाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते झाले.

कटके म्हणाले, प्रत्येकाच्या मनात एक साहित्यिक दडलेला असतो. विद्यार्थ्यांनी डोळे उघडे ठेवून अनुभव घ्यावा. जे जे सुचेल ते लिहावे. अनुभव संवेदनशीलतेने टिपावा. आलेल्या अनुभवाला नितळ मनाने स्वीकारावे. अंर्तबाह्य हलविणाऱ्या अनुभवाचे तार्किकदृष्ट्या विश्लेषण करावे. लेखकाने अनुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करावे.

एकांकिका साहित्य प्रकाराचे वेगळेपण सांगताना ते म्हणाले, मोजक्या शब्दांत व मर्यादित वेळेत एकांकिकेची मांडणी करावी लागते. एकांकिकेसाठी एकच विषय, ठिकाणाचे बंधन पाळण्याची



**एकांकिका लेखन कार्यशाळेमध्ये नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.**

गरज नाही. बंधनामुळे विचारांवर मर्यादा येते. रंगमंचावरील बदलाचे स्वातंत्र्यही घेतले पाहिजे. दिग्दर्शक हा कॅप्टन व कमांडर असावा. कथावस्तू, कथेची मांडणी, प्रादेशिक वैशिष्ट्ये, कथेची भाषा, दृश्यात्मकता, नेपथ्य, संगीत संयोजन, संवाद, रंगभूषा, वेशभूषा, आर्थिक गणित आदी विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. 'चौथा पर्याय, दुभंगून जाता जाता' या स्वलिखित एकांकिकांच्या आधारे त्यांनी एकांकिका लेखनाचे तंत्र व आशयसूत्र याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून एकांकिका लेखनाचे प्रात्यक्षिक करवून घेतले.

डॉ. मुरुमकर म्हणाले, भाषेच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. वाङ्‌मयाच्या अभ्यासाकडे वेगळ्या पद्धतीने बघितले पाहिजे. चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक या क्षेत्रात मी कोठे आहे, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी स्वत:ला विचारला पाहिजे. भाषेच्या विद्यार्थ्यांनी मरगळ झटकून स्वत:च्या पायावर उभे रहावे. काळाबरोबर फक्त जागे होण्याची गरज आहे.

याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. समाधान पाटील, डॉ. रामचंद्र सपकाळ, प्रा. भीमराव तोरणे उपस्थित होते. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी केले. डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले. विविध विभागातील ५५ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

सकाळ
पुणे, शनिवार
२० जानेवारी २०१८
४

# सुचेल ते लिहीत जावे : विजय कटके

**बारामती, ता. १९ :** ''प्रत्येकाच्या मनात एक साहित्यिक दडलेला असतो. विद्यार्थ्यांनी डोळे उघडे ठेवून अनुभव घ्यावा. सुचेल ते लिहीत जावे, अनुभव संवेदनशीलतेने टिपावा. आलेल्या अनुभवाला नितळ मनाने स्वीकारावे,'' असे प्रतिपादन लेखक व नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने आयोजित एकांकिका लेखन कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या प्रसंगी कटके बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी या कार्यशाळेचा प्रारंभ केला.



**बारामती : एकांकिका लेखन कार्यशाळेत नाट्यदिग्दर्शक विजय कटके यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर.**

कटके म्हणाले, ''मोजक्या शब्दांत व मर्यादित वेळेत एकांकिकेची मांडणी करावी लागते. एकांकिकेसाठी एकच विषय, ठिकाणाचे बंधन पाळण्याची गरज नाही. बंधनामुळे विचारावर मर्यादा येते. रंगमंचावरील बदलाचे स्वातंत्र्यही घेतले पाहिजे.''

या प्रसंगी त्यांनी कथावस्तू, कथेची मांडणी, प्रादेशिक वैशिष्ट्ये, कथेची भाषा, दृश्यात्मकता, नेपथ्य, संगीत संयोजन, संवाद, रंगभूषा, वेशभूषा, आर्थिक गणित या घटकांवर मार्गदर्शन केले.

डॉ. मुरूमकर म्हणाले, ''भाषेच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. वाङ्मयाच्या अभ्यासाकडे वेगळ्या पद्धतीने बघितले पाहिजे, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक या क्षेत्रात मी कोठे आहे, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी स्वतःला विचारला पाहिजे. भाषेच्या विद्यार्थ्यांनी मरगळ झटकून स्वतःच्या पायांवर उभे राहावे.''

चौथा पर्याय, दुभंगून जाता जाता आदी स्वलिखित एकांकिकांच्या आधारे त्यांनी एकांकिका लेखनाचे तंत्र व आशयसूत्र याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून एकांकिकालेखनाचे प्रात्यक्षिक करवून घेतले. या प्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. समाधान पाटील, डॉ. रामचंद्र सपकाळ, भीमराव तोरणे उपस्थित होते.

डॉ. रंजना नेमाडे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब,

सकाळ
पुणे, रविवार
२१ जानेवारी २०१८
५



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित भूगोल दिन कार्यक्रमप्रसंगी अमेरिकेतील प्रा. प्रवीण सप्तर्षी यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर.

# पर्यावरणाचा ऱ्हास ही जागतिक चिंता : सप्तर्षी

**बारामती, ता. २०** : पर्यावरणाचा वेगाने होणारा ऱ्हास ही जागतिक चिंता आहे. प्रत्येकाने पुढील पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पर्यावरण संवर्धन व संतुलनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा अमेरिकेतील सॅलिसबरी विद्यापीठाचे प्रा. प्रवीण सप्तर्षी यांनी व्यक्त केली.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात भूगोल दिन कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी बोलताना डॉ. मुरुमकर यांनीही विद्यार्थ्यांची पर्यावरणरक्षणातील जबाबदारी मोठी असून, प्रत्येकाने संकल्प केला तर त्याचा पर्यावरण रक्षणासाठी उपयोग होऊ शकेल, असे सांगितले. सूत्रसंचालन लीना निकाळजे व सचिन शिंगटे यांनी केले. डॉ. अरुण मगर यांनी आभार मानले. भूगोलशास्त्र विभागातील संजय खोमणे, प्रशांत शिंदे, सचिन गायकवाड आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

135
22/1/18

मा. प्राचार्य साहेब,

सकाळ
पुणे, बुधवार
१४ फेब्रुवारी २०१८
७

AEMS

Anekant Education Society's

# ANEKANT ENGLISH MEDIUM SCHOOL

T.C. College Campus, Baramati. Phone – 02112-221305
Website – www.anekantems.org Email : anekantems@gmail.com

**Jain Religious Minority Institution**

**Positions vacant for passionate & experienced teachers for the academic year 2018-2019.**

**Pre-Primary :** Graduate with E.C.C.E. / T.T.C. / N.T.T. Preferably Convent Educated. Minimum 2 Years Experience.

**Primary** : Graduate / Post Graduate with D.Ed / B.Ed for Maths, Hindi, Marathi & Sanskrit subjects. Preferably Convent Educated. Minimum 3 years Experience.

**Sports Teacher** : Graduate with B.P.Ed, Minimum 3 Years Exp.

**Librarian** : Graduate with B.Lib, Minimum 3 Years Experience.

**Peon** : HSC Pass.

- Preference will be given to 'Jain' candidates.
- The posts are subject to availability of actual workload.
- Computer knowledge is compulsory for all teachers.
- Apply to The Principal, Anekant English Medium School, Baramati along with Bio-Data & necessary documents before 24/02/2018.
- Short listed candidates will be communicated for further interview.

**Principal**
Anekant English Medium

**Chairman**
Anekant English Medium

Tuljaram Chaturchand College Library Baramati

पुणे जिल्हा दक्षिण ९ पुढारी पुणे, बुधवार १४ फेब्रुवारी २०१८

# टीसी महाविद्यालयात मूल्यशिक्षण कार्यशाळा

**बारामती : प्रतिनिधी**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय (टीसी) व राष्ट्रीय सेवा योजना विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय मूल्यशिक्षण कार्यशाळेचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात गुरुवारी (दि. ८) आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते अभय भंडारी उपस्थित होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात अभय भंडारी म्हणाले, समाजात वावरताना प्रामाणिकपणा, समता, बंधुता, सामाजिक परिस्थितीची जाणीव, अन्यायाविरुध्द आवाज उठविणे असे सामाजिक गुण अंगी बाळगणे आवश्यक आहे. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात सावली अनाथश्रमाचे संचालक महेश अहिवळे यांनी मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी कशी जपावी याविषयी मार्गदर्शन केले.



**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मूल्यशिक्षण कार्यशाळेत मान्यवरांचे स्वागत करताना प्राचार्य चंद्रशेखर मुरुमकर.**

प्राचार्य चंद्रशेखर मुरुमकर यांनी आपल्या भाषणात सद्यस्थितीत तरुणांमध्ये मूल्यशिक्षणाचे बीज रुजविणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यशाळेत पुणे, अहमदनगर आणि नाशिक येथील सुमारे ४५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. कार्यशाळेचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. भगवान माळी यांनी केले. या कार्यशाळेचे नियोजन प्रा. विलास कर्डीले यांनी केले. सूत्रसंचालन उन्मेश तावरे व कोमल म्हांगडे यांनी केले. प्रा. डॉ. प्रतिभा जावळे यांनी आभार मानले. स्वयंसेवकामांमधून प्रीया गाडेकर, प्रज्ञा कुलकर्णी, प्रियांका पाटील व तुषार गावडे यांनी मनोगत व्यक्त केले.

N35
१५/२/१८

सकाळ
पुणे, बुधवार
७ मार्च २०१८

# 'निरोगी जीवनासाठी व्यायाम गरजेचा'

बारामती शहर, ता. ६ : "बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आहे, निरोगी जीवन जगायचे असेल; तर समतोल आहार, पुरेसा व्यायाम गरजेचा आहे," असे प्रतिपादन डॉ. हिमगौरी वडगावकर यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील योग विभाग यांच्या वतीने 'डायनॅमिक योग व आधुनिक जीवनशैली' कार्यशाळा नुकतीच झाली. या कार्यशाळेसाठी डॉ. हिमगौरी वडगावकर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासह प्रा. राजेंद्रकुमार डांगे यांनी आधुनिक बदलत्या जीवनशैलीमुळे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्यावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी ऋतुनुसार प्रथिने, पिष्टमय, स्निग्ध व क्षारयुक्त आहाराचा कसा समावेश करावा, याविषयी मार्गदर्शन केले; तसेच आसने, प्राणायाम, शुद्धीक्रिया, बंध, मुद्रा, योगनिद्रा याचे प्रशिक्षण देण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ. समाधान पाटील, मानसशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विजयकुमार शिंदे उपस्थित होते. योग विभागप्रमुख आर. डी. जगताप यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेत योग विभागातील एकूण १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. पूजा घोरपडे व मच्छिंद्र साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. जी. एम. ढमे यांनी आभार मानले.

# तु. च. महाविद्यालयात योग व आधुनिक जीवनशैली कार्यशाळा संपन्न

बारामती - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डायनॅमिक योग व आधुनिक जीवनशैली कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी बारामतीतील प्रसिद्ध डॉ.हिमगौरी वडगावकर या प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या. डॉ.हिमगौरी वडगावकर व प्रा.राजेंद्रकुमार डांगे यांनी आधुनिक बदलत्या जीवनशैलीमुळे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्यावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी ऋतुनुसार प्रथिने, पिष्टमय, स्निग्ध व क्षारयुक्त आहाराचा कसा समावेश करावा, याविषयी मार्गदर्शन केले. तसेच आसने, प्राणायाम, शुद्धीक्रिया, बंध, मुद्रा, योगनिद्रा याचे प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सचिन गाडेकर हे होते. अध्यक्षीय पदावरून बोलताना ते म्हणाले की, आरोग्यात डायनॅमिक योग ही काळाची गरज निर्माण झालेली आहे असे मत मांडले. याप्रसंगी विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ.समाधान पाटील, मानसशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विजयकुमार शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक योगा विभागप्रमुख प्रा.जगताप आर.डी. यांनी केले. या कार्यशाळेत योगा विभागातील एकूण १३० मुला-मुलींनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या आरोग्य जतनासाठी भविष्यात उपयोग होईल असे मत अनेक विद्यार्थ्यांनी मांडले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु.पुजा घोरपडे व कु.मच्छिंद्र साळुंखे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.ढमे जी.एम. यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी योगा व मानसशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांनी बहुमोल सहकार्य केले.

दि. ८/३/२०१८

मा० प्राचार्य साहेब,



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

कला, विज्ञान व वाणिज्य, बारामती

Phone : (02112) 222405 Fax : (02112) 222728

## निविदा सूचना

सन २०१८-१९ या वर्षाकरीता महाविद्यालय व ग्रंथालयास मराठी, हिंदी, इंग्रजी भाषिक वर्तमानपत्रे व साप्ताहिकांचा स्थानिक पातळीवर पुरवठा करणेकरीता सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत. छापील निविदा महाविद्यालयाचे स्टोअर विभागामध्ये रू. २५०/- रोखीने उपलब्ध आहे. निविदा स्विकारणेची अंतिम तारीख १५/३/२०१८ पर्यंत राहील. निविदा स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी स्टोअर/ग्रंथालय विभागाशी संपर्क साधावा.

**डॉ. चंद्रशेखर मुरूमकर**
प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
बारामती

**श्री. जवाहर मोतीलाल शहा**
सचिव
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती

ADS
६/३/१

सकाळ
पुणे, गुरुवार
२२ मार्च २०१८
६

# नॅनो तंत्रज्ञानाला भविष्यात अधिक वाव

## माजी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांचे प्रतिपादन; बारामती येथे कार्यक्रम

**बारामती शहर, ता. २१ :** विद्यार्थी जीवन जगताना ज्ञान, कौशल्ये व मूल्ये यांची जपणूक करायला हवी. येणारा काळ हा नॅनो तंत्रज्ञानाचा असेल. त्यामुळे या विषयाला भविष्यात अधिक वाव आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांनी केले.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या उत्कृष्ट गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. पवार यांच्या हस्ते झाला. त्या प्रसंगी ते बोलत होते. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त विकास शहा (लेंगरेकर) अध्यक्षस्थानी होते.

आगामी काळात नॅनो तंत्रज्ञानाने जगातील अनेक समीकरणे बदलणार आहेत. मानवी जीवन अधिक सुखकर होईल. विद्यार्थ्यांनीही हा बदल विचारात घेता या विषयाकडे वळण्यास हरकत नाही, असे पवार यांनी सांगितले.



**बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात माजी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांचा सत्कार करताना विकास शहा.**

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी स्वागत केले.

एप्रिल २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या बी. एस्सी. परीक्षेत विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक आल्याबद्दल प्राजक्ता चंदनकर हिचा तसेच चौथी आल्याबद्दल प्रियांका लेंबे हिचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यापीठातर्फे सन २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या बी. लिब. परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल योगेश राऊत याचा, तर २०१५ मध्ये एम. एस्सी. संख्याशास्त्र विषयामध्ये विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल पूजा शितोळे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. यासोबतच महाविद्यालयातील प्रत्येक वर्गातून प्रथम आलेल्या २३ विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. कला विभागातील २१, वाणिज्य विभागातील ९, विज्ञान विभागातील ३३ तसेच इतर ८ विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. महाविद्यालयाने घेतलेल्या अनेकांत लघुचित्रपट महोत्सवातील सर्वोत्कृष्ट लघुपट बनविणाऱ्या ३ विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

अहवालाचे वाचन प्रा. सदाशिव पुराणिक यांनी केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते.

मा. प्राचार्य साहेब,

पुण्य नगरी दि. २३।३।१८ पान ४

# प्राचार्य मुरूमकर विद्या परिषदेवर



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यापरिषदेवर राज्यपाल व कुलगुरू यांनी सदस्यपदी नियुक्ती केली. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर गेल्या ३१ वर्षांपासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये अध्यापन करत आहेत. गेली नऊ वर्षे ते महाविद्यालयाचे प्राचार्य कार्यरत आहेत. त्यांना एपीएसआय संस्थेतर्फे 'आंतरराष्ट्रीय प्लँट सायंटीस्ट पुरस्कार प्राप्त झाला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांना 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' व महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' प्रदान केला आहे. त्याचबरोबर मदुराई येथील 'पर्ल फाउंडेशन' या संस्थेने त्यांना 'लाइफ टाइम अचिवमेंट पुरस्कार' नुकताच प्रदान केला आहे. वनस्पतीशास्त्र या विषयात त्यांचे ७० हून अधिक संशोधन लेख राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रसिद्ध झाले आहेत. पुण्य नगरी दि. २३।३।१८ ४

प्रभात दि. २३।३।१८ पान ३

# विद्या परिषदेच्या सदस्यपदी डॉ. मुरुमकर



बारामती- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर राज्यपाल, महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू यांनी विद्या परिषद सदस्यपदी नियुक्ती केली आहे. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर हे गेल्या ३१ वर्षांपासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये अध्यापन करत आहेत. तर गेल्या नऊ वर्षांपासून ते महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठाने त्यांना उत्कृष्ट 'प्राचार्य पुरस्कार' प्रदान केला आहे. वनस्पतीशास्त्र या विषयात त्यांचे ७० पेक्षा अधिक संशोधन लेख अनेक ख्यातनाम राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रसिद्ध झाले आहेत. 'ॲकॅडेमी ऑफ प्लँट सायन्सेस'. इंडिया (एपीएसआय) या संस्थेतर्फे आंतरराष्ट्रीय प्लँट सायंटीस्ट पुरस्कार देखील त्यांना प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे अहमदाबाद येथील 'सायंटिस्ट मिट २०१५' मध्ये त्यांना 'फेलो ऑफ अकॅडमी ऑफ प्लॅन्ट सायन्सेस' इंडिया या गौरवाने पुरस्कृत केला होता. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर हे अनेक नामांकित संशोधन संस्थांचे सक्रिय सदस्य आहेत. आजवर अनेक शाळा, महाविद्यालयांमधून वैज्ञानिक दृष्टिकोन व त्या माध्यमातून प्रबोधन करण्यासाठी जवळपास १०० पेक्षा अधिक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा-सराफ, सचिव जवाहर मोतीलाल शाह -वाघोलीकर, संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राध्यापक व शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आनंद व्यक्त केला आहे. प्रभात २३।३।१८ पान ३

पुढारी दि. २३।३।१८ पान

# विद्या परिषद सदस्यपदी डॉ. चंद्रशेखर मुरुमकर

बारामती : प्रतिनिधी



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषद सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. मुरुमकर हे गेल्या ३१ वर्षांपासून महाविद्यालयामध्ये अध्यापन करत आहेत. गेल्या ९ वर्षांपासून ते प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वीच विद्यापीठाने त्यांना 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' व महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' दिला आहे. मदुराई येथील 'पर्ल फाउंडेशन'चा 'लाईफ टाइम अचिवमेंट पुरस्कार', अकॅडमी ऑफ प्लँट सायन्सेस इंडियाचा 'आंतरराष्ट्रीय प्लँट सायंटिस्ट पुरस्कार' आणि अहमदाबाद येथे झालेल्या 'सायंटिस्ट मिट २०१५' मध्ये 'फेलो ऑफ अकॅडमी ऑफ प्लँट सायन्सेस इंडिया' आदी पुरस्कृत त्यांना मिळाले आहेत. वनस्पतीशास्त्र विषयात त्यांचे ७० हून अधिक संशोधन लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा, सचिव जवाहर शहा आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

पुढारी २३।३।१८ पान ४

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा. प्राचार्य साहेब,

सकाळ
पुणे, सोमवार
२६ मार्च २०१८
६

# टी.सी. कॉलेजात सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल युनिट

बारामती- येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व महाविद्यालयातील फूड टेक्नोलॉजी अँड रिसर्चचे विभागप्रमुख डॉ. वाजीद खान दि. २५ जुले रोजी,श्रीनगर येथे आयोजित पहिल्या जैव-उद्योजकता शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे औपचारिक निमंत्रण ग्लोबीस ॲग्री अँड फूड एंटरप्राइजचे सी.ई.ओ. श्री. शब्बीर अहमद यांचेकडून देण्यात आले असून सदर परिषदेत जैव-उद्योजकता, औषधी आणि सुगंधी शेती, सेंद्रिय शेती, लागवडोत्तर प्रक्रिया तसेच मूल्यवर्धन इ. बाबींवर भर दिला जाणार आहे.

या परिषदेकरीता देश-विदेशातील नामांकीत शास्त्रज्ञ तसेच विविध विद्यापीठातील कुलगुरू उपस्थित राहणार असून त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. राम विश्वकर्मा, संचालक आय आय आय एम जम्मु, डॉ. एस.एम. इलीयास, माजी कुलगुरू एन.डी.यु.ए.एस.टी. फैजाबाद, उत्तरप्रदेश डॉ. पुर्णिमा शर्मा, सीईओ बायोटेक्नोलॉजी कॉन्सोररिअम ऑफ इंडिया, श्री. के. एच. रिझवी, आय.ए.एस., आयुक्त सचिव, श्रम व रोजगार विभाग, जम्मु काश्मीर इ.ची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सदर परिषदेचे आयोजन इंग्लंड स्थित व्हॅलिएंट बिझीनेस मिडीया आणि ग्लोबस ॲग्री अँड फुड एंटरप्राइझ यांचे द्वारा केले आहे. याठिकाणी प्राचार्य डॉ. मुरूमकर हे ग्लोबस एंटरप्राइझ सोबत भविष्यातील शैक्षणिक व संशोधनासाठी एकत्र काम करण्याच्या अनुषंगाने चर्चा करणार असून त्याकरीता प्राधान्यक्रमाची रूपरेषा व सामंजस्य कराराची पूर्तता करणार आहे. हा सामंजस्य करार महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकांना नाविन्यपूर्ण कल्पना आणि उत्पादने यांचे निर्मितीकरीता उपयुक्त असणार आहे व त्याद्वारे सक्षम आणि प्रगत बाजारपेठेला चालना मिळणार आहे.

साप्ताहिक लोक वार्ता

## डॉ.मुरूमकर शिखर परिषदेसाठी निमंत्रित



बारामती:- श्रीनगर येथे २५ जुलै रोजी होणाऱ्या जैव-उद्योजकता शिखर परिषदेमध्ये येथील तु.च. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर व महाविद्यालयातील फूड टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड रिसर्च विभागप्रमुख डॉ.वाजीद खान सहभागी होणार आहेत. या परिषदेचे निमंत्रण ग्लोबीस ॲग्री ॲन्ड फूड एंटरप्रायजेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी शब्बीर अहमद यांचेकडून देण्यात आले आहे. या परिषदेत जैव-उद्योजकता, औषधी आणि सुगंधी शेती, सेंद्रिय शेती, लागवडोत्तर प्रक्रिया तसेच मूल्यवर्धन इ. बाबींवर भर दिला जाणार आहे. या परिषदेकरिता देश-विदेशातील नामांकित शास्त्रज्ञ तसेच विविध विद्यापीठातील कुलगुरू उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे आयोजन इंग्लंडस्थित व्हॅलिएंट बिझनेस मीडिया आणि ग्लोबस ॲग्री ॲन्ड फूड एंटरप्रायजेस यांच्याद्वारे केले आहे.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा. प्राचार्य साहेब

३ पुढारी | पुणे, बुधवार १८ जुलै २०१८

# शिखर परिषदेसाठी डॉ. मुरुमकर निमंत्रित



डॉ. चंद्रशेखर मुरुमकर

**बारामती :** श्रीनगर येथे २५ जुलै रोजी होणाऱ्या जैव- उद्योजकता शिखर परिषदेमध्ये येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व महाविद्यालयातील फूड टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्चचे विभागप्रमुख डॉ. वाजीद खान सहभागी होणार आहेत. या परिषदेचे निमंत्रण ग्लोबीस ॲग्री अँड फूड एंटरप्राइजचे मुख्य कार्यकारी अधिकारी शब्बीर अहमद यांचेकडून देण्यात आले आहे. या परिषदेत जैव-उद्योजकता, औषधी आणि सुगंधी शेती, सेंद्रिय शेती, लागवडोत्तर प्रक्रिया तसेच मूल्यवर्धन इ. बाबींवर भर दिला जाणार आहे. या परिषदेकरिता देश-विदेशातील नामांकित शास्त्रज्ञ तसेच विविध विद्यापीठांतील कुलगुरू उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे आयोजन इंग्लंडस्थित व्हॅलिएंट बिझीनेस मीडिया आणि ग्लोबस ॲग्री अँड फूड एंटरप्राइजेस यांच्याद्वारे केले आहे.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

135 / 5/2017

# मा. अजितदादा पवार

मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

आपणांस वाढदिवसाच्या

**हार्दिक शुभेच्छा**



## मे. जवाहर ब्रदर्स (वाघोलीकर)

धवलगिरी सिनेमा रोड, बारामती, जि.पुणे

* जवाहर मोतीलाल शहा * हर्षवर्धन मोतीलाल शहा
* राहुल जवाहर शहा * धवल अभय शहा * स्वरूप संजय शहा * आनंद हर्षवर्धन शहा

**वाघोलीकर परिवार, बारामती**

---



# मा. अजितदादा पवार

मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

आपणांस वाढदिवसाच्या

**हार्दिक शुभेच्छा**

○ शुभेच्छुक ○

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

अध्यक्ष, सचिव, खजिनदार व सर्व विश्वस्त, प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

## अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती

प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

## अनेकान्त इंग्लिश मीडीयम स्कूल, बारामती

प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

मा. प्राचार्य साहेब

लोकमत पुणे, शनिवार, दि. २१ जुलै २०१८ 3

# डॉ. मुरुमकर यांचा शिखर परिषदेत सहभाग

## जैव-उद्योजकता : लागवडोत्तर प्रक्रियेवर चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती** : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व महाविद्यालयातील फूड टेक्नोलॉजी अँड रिसर्चचे विभागप्रमुख डॉ.वाजीद खान दि. २५ जुलै रोजी श्रीनगर येथे आयोजित पहिल्या जैव-उद्योजकता शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे औपचारिक निमंत्रण ग्लोबीस ॲग्री अँड फूड एंटरप्राइजचे सी.ई.ओ. शब्बीर अहमद यांचेकडून देण्यात आले आहे. या परिषदेत जैव-उद्योजकता, औषधी आणि सुगंधी शेती, सेंद्रिय शेती, लागवडोत्तर प्रक्रिया तसेच मूल्यवर्धन इ. बाबींवर भर दिला जाणार आहे.

◆ आयोजन इंग्लंडस्थित व्हॅलिएंट बिझीनेस मिडीया आणि ग्लोबस ॲग्री अँड फुड एंटरप्राइझ यांनी केले आहे. डॉ.मुरुमकर भविष्यातील शैक्षणिक व संशोधनासाठी एकत्र काम करण्याच्या अनुषंगाने चर्चा करणार आहेत. प्राधान्यक्रमाची रुपरेषा व सामंजस्य कराराची पूर्तता करणार आहे. नाविन्यपूर्ण कल्पना, निर्मितीकरिता उपयुक्त चर्चा होणार आहे.

देश-विदेशातील नामांकित शास्त्रज्ञ तसेच विविध विद्यापीठातील कुलगुरु व प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

ABS
original
15/08/71

Tuljaram Chaturchand College Library Baramati

सकाळ
शुक्रवार, ३ ऑगस्ट २०१८ | ७

# टीसी महाविद्यालयात दोन नवीन अभ्यासक्रम

## डेअरी टेक्नॉलॉजी व रिटेल मॅनेजमेंटला मान्यता



**बारामती शहर, ता. २ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास 'डेअरी टेक्नॉलॉजी' आणि 'रिटेल मॅनेजमेंट' हे बॅचलर ऑफ व्होकेशनल पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली आहे.

या अभ्यासक्रमाचा कालावधी तीन वर्षांचा असून, अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पदवी प्रदान केली जाणार आहे.

यूजीसीकडून सातत्याने कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यामध्ये शिक्षणाबरोबर कौशल्ये, व्यावसायिकता आदी गुणांचा विकास करणे हा उद्देश आहे.

सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' व 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार', नॅककडून ए प्लस मूल्यांकन, डीबीटीतर्फे स्टार कॉलेज, यूजीसीचे बी व्होकेशनल अभ्यासक्रम यामुळे महाविद्यालयाचा दर्जा उंचावला असून, या नवीन अभ्यासक्रमांमुळे युवकांना अनेक क्षेत्रांत नवीन संधी उपलब्ध होणार असल्याचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी सांगितले.

### प्रवेशप्रक्रिया सुरू

**बारावीच्या परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे विद्यार्थी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. डेअरी टेक्नॉलॉजी आणि रिटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी डेअरी टेक्नॉलॉजीच्या प्रवेशासाठी डॉ. वाजीद खान, फूड टेक्नॉलॉजी विभागप्रमुख (९३७३४४३७०८) व रिटेल मॅनेजमेंट या अभ्यासक्रम प्रवेशासाठी प्रा. प्रकाश मेहेर, वाणिज्य विभागप्रमुख (९८२२३७२९३६) यांच्याशी संपर्क साधावा.**

बारामती प्राईड
आपला परिसर, आपल्या बातम्या...
शुक्रवार, ३ ऑगस्ट २०१८ पान ७

# महाराष्ट्र राज्य ही विचारवंत, राष्ट्रकर्त्यांची भूमी : डॉ. पवार

बारामती : वार्ताहर

महाराष्ट्रात महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहूमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समृद्ध अशी परंपरा आहे. महाराष्ट्र ही विचारवंत आणि राज्यकर्त्यांची भूमी असल्याचे प्रतिपादन डॉ.प्रकाश पवार यांनी केले.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने 'महाराष्ट्राचे बदलते स्वरूप' या विषयावर राज्यस्तरीय एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी बीज भाषणात डॉ. प्रकाश पवार यांनी यशवंतराव चव्हाण ते देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कारकिर्दीबद्दल आपले विचार मांडले. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाचा आढावा घेतला.



प्राचार्य [illegible], डॉ. प्रकाश पवार, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, डॉ. पी.डी. देवरे, डॉ. [illegible]

कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन अध्यक्ष डॉ.पी.डी.देवरे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय संस्कृतीवर भाष्य केले. सध्याच्या समाजासमोर अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांवर सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांनी अभ्यास करून प्रश्न सोडविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पूर्वी महाराष्ट्र हे एक राष्ट्र होते. महाराष्ट्राची दृष्टी व्यापक होती. सध्याच्या काळात मुलांना आपले हक्क आणि कर्तव्य शिकवली पाहिजेत. तसेच सामाजिक विषयांचे मंथन करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा मोठे योगदान देत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील प्राध्यापकांनी सहभाग घेवून राजकीय, सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, कृषी, नेतृत्व, साहित्य इत्यादी क्षेत्रातील बदलत्या स्वरूपाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजू पांडे तर आभार प्रा.अविनाश सावळकर यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा, सचिव जवाहर शाह यांनी शुभेच्छा दिल्या.

> महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी कृषी व औद्योगिक व्यवस्थेचा पाया घातला. त्यांनी अनेक पुरोगामी निर्णय घेतले. त्यानंतरच्या काळात शरद पवार यांनी अतिशय महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांच्या सारखी राष्ट्रीय दृष्टी सध्यातरी कोणाकडेच नाही, असे मत डॉ. प्रकाश पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

लोकमत पुणे, शुक्रवार, दि. ३ ऑगस्ट २०१८
पान 3

# महाराष्ट्राला समृद्ध विचारांची परंपरा

## डॉ. प्रकाश पवार : महाराष्ट्राचे बदलते स्वरुप विषयावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात डॉ. प्रकाश पवार यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व इतर.

बारामती : महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहूमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समृद्ध अशी परंपरा आहे. महाराष्ट्र ही विचारवंत आणि राज्यकर्त्यांची भूमी असल्याचे प्रतिपादन डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने महाराष्ट्राचे बदलते स्वरूप या विषयावर राज्यस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेच्या भाषणात डॉ. पवार यांनी यशवंतराव चव्हाण ते देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कारकीर्दीबद्दल आपले विचार मांडले. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाचा आढावा घेतला.

◆ पूर्वी महाराष्ट्र हे एक राष्ट्र होते. महाराष्ट्राची दृष्टी व्यापक होती. सध्याच्या काळात मुलांना आपले हक्क आणि कर्तव्य शिकवली पाहिजेत. तसेच, सामाजिक विषयांचे मंथन करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा मोठे योगदान देतात, असे प्रतिपादन मुरुमकर यांनी केले.

उद्घाटन डॉ. पी. डी. देवरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय संस्कृतीवर भाष्य केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ.हनुमंत फाटक यांनी केले, तर आभार प्रा.अविनाश सावळकर यांनी मानले.

Library

मा. प्राचार्य साहेब

सकाळ
शनिवार, ४ ऑगस्ट २०१८ | ४

# ग्लोबिल्स ॲग्रोबरोबर 'टीसी'चा करार

**बारामती शहर, ता. ३ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व श्रीनगर येथील ग्लोबिल्स ॲग्रो बिझनेस प्रा. लि. या कंपनीमध्ये नुकताच सामंजस्य करार झाला. शेतीपूरक व्यवसाय, रोजगाराच्या संधी, प्रशिक्षण व विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामध्ये आदान-प्रदान बाबतच्या या परस्पर सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व ग्लोबिल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी शब्बीर अहमद यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

या कराराच्या माध्यमातून माहितीची देवाण घेवाण होण्याबरोबरच जम्मू-काश्मीरमधील युवकांना रोजगाराच्या नवीन संधी व साधने उपलब्ध होण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. श्रीनगर येथे पार पडलेल्या 'व्हॅलिएंट बिझनेस मीडिया', लंडन व ग्लोबिल्स ॲग्रो बिझनेस प्रा.लि. श्रीनगर यांच्या वतीने आयोजित पहिल्या आंतरराष्ट्रीय जैव उद्योजक परिषद - जीबीएस २०१८ मध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व फूड टेक्नॉलॉजी व रिसर्च विभागाचे विभागप्रमुख डॉ. वाजीद खान यांनी शोधनिबंधाचे वाचन केले. परिषदेमध्ये अनेक शास्त्रज्ञ, कुलगुरू, उद्योजक, विद्यार्थी सहभागी झाले होते.




श्रीनगर : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व ग्लोबिल्स ॲग्रो बिझनेस कंपनीत परस्पर सामंजस्य करारावर स्वाक्षरीनंतर करार प्रदान करताना (डावीकडे) प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व शब्बीर अहमद.

> काश्मीरमध्ये उपलब्ध असलेली संसाधने, शेतीपूरक व्यवसायासाठी पोषक वातावरण व उपलब्ध असलेल्या अनुकूल सुविधांचा वापर काश्मिरी युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पूरक होऊ शकेल. या सोबतच रोजगार निर्मितीसाठी युवकांना आवश्यक प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे व त्यासाठी टीसी महाविद्यालय पुढाकार घेणार आहे.
>
> **- डॉ. चंद्रशेखर मुरूमकर,**
> प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

ABS 6/8

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

सकाळ
गुरुवार, ९ ऑगस्ट २०१८ | ३

# 'टीसी'मध्ये कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**बारामती शहर, ता. ८ :** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या संपाला पाठिंबा देण्यासाठी येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही तीन दिवस काम बंद आंदोलन पुकारले आहे. यामुळे महाविद्यालयाचे प्रशासकीय कामकाज थंडावले आहे.


**बारामती : वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांच्या पथकासमवेत आंदोलक कामगार.**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष डी. आर. कुंभार, उपाध्यक्षा सुषमा संगई, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा, ज्ञानेश्वर लिंगे, अमोल पाटील यांच्यासह साठहून अधिक शिक्षकेतर कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत. सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करून सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, अंशदायी पेन्शन योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करावी, शिक्षण क्षेत्रातील विनाअनुदान धोरण रद्द करावे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, पाच दिवसांचा आठवडा करावा, महागाई भत्ता केंद्राच्या धर्तीवर त्वरीत रोख स्वरूपात द्यावा आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब,

दै. पुढारी दि ७/११/१८ पानं २

# टीसी महाविद्यालय-जम्मू-काश्मीर कंपनीमध्ये करार



तुळजाराम महाविद्यालय व ग्लोबिल्स कंपनीमध्ये परस्पर सामंजस्य करार करण्यात आला.

**बारामती : प्रतिनिधी**

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद(टीसी) महाविद्यालय व जम्मू-काश्मीर स्थित ग्लोबिल्स शेतीपूरक व्यवसाय कंपनीमध्ये परस्पर सामंजस्य करार करण्यात आला.

श्रीनगर येथे पार पडलेल्या 'व्हॅलिएंट बिझनेस मीडिया', लंडन व 'ग्लोबिल्स अॅग्रो बिझनेस प्रा. लि.', श्रीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या आंतरराष्ट्रीय 'जैवउद्योजकपरिषद-जीबीएस २०१८'मध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व फूड टेक्नॉलॉजी व रिसर्च विभागाचे विभागप्रमुख डॉ. वाजीद खान यांनी सहभाग घेऊन शोधनिबंधाचे वाचन केले. या परिषदेमध्ये अनेक ख्यातनाम शास्त्रज्ञ, कुलगुरू, उद्योजक व संशोधक, विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्राचार्य डॉ. मुरुमकर यांनी आपल्या बीजभाषणामध्ये काश्मीरमध्ये उपलब्ध असलेली संसाधने, शेतीपूरक व्यवसायासाठी पोषक वातावरण व उपलब्ध असलेल्या अनुकूल सुविधांचा वापर काश्मिरी युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पूरक होऊ शकतील, असे मत मांडले. यासोबतच रोजगारनिर्मितीसाठी युवकांना आवश्यक प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी टीसी महाविद्यालय पुढाकार घेणार असल्याचे सांगितले.

या परिषदेदरम्यान तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व ग्लोबिल्स अॅग्रो बिझनेस कंपनी यांच्यामध्ये शेतीपूरक व्यवसाय, रोजगाराच्या संधी, प्रशिक्षण व विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामध्ये आदान-प्रदानबाबत परस्पर सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सदर कराराच्या माध्यमातून माहितीची देवाण-घेवाण होण्याबरोबरच जम्मू-काश्मीरमधील युवकांना रोजगाराच्या नवीन संधी व साधने उपलब्ध होण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दै. पुढारी ७/११/१८ पानं २

दै. पुढारी दि ७/११/१८ पानं ५

# 'टीसी' महाविद्यालयात दोन नवे अभ्यासक्रम

**बारामती : प्रतिनिधी**

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात डेअरी टेक्नॉलॉजी आणि रिटेल मॅनेजमेंट हे दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने हे बॅचलर ऑफ व्होकेशनल डिग्री कोर्सेस सुरू करण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम तीन वर्षांचे आहेत. ते पूर्ण करणाऱ्याला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पदवी प्रदान केली जाणार आहे. युजीसीकडून सातत्याने कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यामध्ये शिक्षणाबरोबर कौशल्ये, व्यावसायिकता इत्यादी गुणांचा विकास करणे हा महत्त्वाचा उद्देश आहे.

सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय व उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, नॅककडून ए प्लस मूल्यांकन, डीएसटी एफआयएसटी डीबीटीतर्फे स्टार कॉलेज स्किम व युजीसीची बी व्होकेशनल अभ्यासक्रम यामुळे तुळजाराम महाविद्यालयाचा दर्जा उंचावला आहे. नवीन या दोन अभ्यासक्रमांना आणखी संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार असल्याचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सांगितले. बारावीच्या परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळू शकेल. डेअरी टेक्नॉलॉजी आणि रिटेल मॅनेजमेंटची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुकांनी डॉ. वाजीद खान व प्रा. प्रकाश मेहेर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आले आहे.

दै. पुढारी ७/११/१८ पानं ५

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

संक्षिप्त २ पुढारी | पुणे, गुरुवार ९ ऑगस्ट २०१८



निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांचा महाविद्यालयाकडून सत्कार करण्यात आला.

## प्रत्येकाने सजग व्हावे : हेमंत महाजन

**बारामती :** नागरिक म्हणून प्रत्येकजण सजग झाला, तर देशाला कोणाकडूनही धोका होणार नाही, असे प्रतिपादन निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी केले. येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर अध्यक्षस्थानी होते. महाजन म्हणाले, प्रत्येकानेच बंदूक घेऊन सीमेवर लढण्याची गरज नाही. आपण सजग राहिलो तर अनेक समस्या कमी होऊ शकतील. कारगिल युद्धातील ६० दिवसांत भारतीय सैन्याने केलेल्या अतुलनीय व रोमांचकारी कामगिरीची त्यांनी या वेळी सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. नितीन खोमणे यांनी केले. उपस्थितांचे स्वागत प्रा. राजेंद्र आगवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय शेंडे यांनी केले. प्रा. अशोक ढमे यांनी आभार मानले.

साप्ताहिक रणशिंग दि. ९/८/२०१८

## तु.च. महाविद्यालयात डेअरी टेक्नॉलॉजी, रिटेल मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रम सुरू

बारामती - येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास डेअरी टेक्नॉलॉजी आणि रिटेल मॅनेजमेंट हे बॅचलर ऑफ व्होकेशनल डिग्री कोर्सेस सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली आहे. या कोर्सचा कालावधी तीन वर्षाचा असून हा कोर्स पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे कडून पदवी प्रदान केली जाईल. युजीसीकडून सातत्याने कौशल्यावर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यामध्ये शिक्षणाबरोबर कौशल्ये, व्यावसायिकता इ. गुणांचा विकास करणे हा या कोर्सचा उद्देश आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा उत्कृष्ठ महाविद्यालय व उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, नॅककडून ए+मुल्यांकन, डीएसटी एफआयएसटी, डीबीटीतर्फे स्टार कॉलेज स्कीम व यूजीसीची बी व्होकेशनल अभ्यासक्रम यामुळे महाविद्यालयाचा दर्जा उंचावला असून या नवीन अभ्याक्रमांमुळे युवकांना अनेक क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होणार असल्याचे मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी सांगितले.

बारावीच्या परीक्षेत ५० टक्के पेक्षा जास्त मार्क्स मिळविणारे विद्यार्थी या कोर्सला प्रवेश घेऊ शकतात. डेअरी टेक्नॉलॉजी आणि रिटेल मॅनेजमेंट कोर्सेसची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छूक विद्यार्थ्यांनी डेअरी टेक्नॉलॉजीच्या प्रवेशासाठी डॉ. वाजीद खान, फूड टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख मो. ९३७३४४३७०८ व रिटेल मॅनेजमेंट या कोर्सच्या प्रवेशासाठी प्रा. प्रकाश मेहेर, वाणिज्य विभाग प्रमुख मो. ९८२२३७२९३६ यांच्याशी संपर्क साधावा अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी दिली.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

प्रभात दि. ११/०८/१८ पान ५

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात कार्यशाळा

**जळोची, दि. १० (वार्ताहर)** - एकविसाव्या शतकातील भारत स्मार्ट सिटीकडे वळत असताना समाजातील युवती देखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हिच या शतकाची मोठी भरारी असेल. या उद्देशानेच भारतीय जैन संघटना आणि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी युवतींना मार्गदर्शन केले. नगरपरिषदेच्या सदस्या डॉ. सई सातव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. प्रा. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले होते. आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी सूत्रसंचालन केले तर नीता गावडे यांनी आभार मानले.

प्रभात ११/०८/१८ पान ५

मा. प्राचार्य साहेब,

दै. पुढारी दि. ११/०८/१८ पान ५

# 'टीसी' महाविद्यालयात स्मार्ट गर्ल कार्यशाळा

**बारामती : प्रतिनिधी**

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दोनदिवसीय स्मार्ट गर्ल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ महिलांनी मते व्यक्त केली.

एकविसाव्या शतकातील भारत स्मार्टसिटीकडे वळत असतानाच समाजातील युवतीदेखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हीच या शतकाची मोठी भरारी असेल, या उद्देशानेच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी उपस्थित महाविद्यालयातील युवतींना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून बारामतीच्या नगरसेविका डॉ. सुहासिनी सातव उपस्थित होत्या. आत्मविश्वासाची नितांत गरज स्पष्ट करताना खऱ्या स्मार्टगर्लनि स्वत:वरील विश्वास कधीही ढळू न देता, स्वत:ला नकारात्मक विचारांपासून कसे परावृत्त व्हावे, याविषयी युवतींसोबत संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्मार्टगर्ल या मूळ संकल्पनेचे विश्लेषण करीत स्मार्टगर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे, तर अंतरंगामध्ये बदल घडविणे कसे गरजेचे आहे हे ऐतिहासिक उदाहरणासहीत स्पष्ट केले. या कार्यशाळेसाठी जयश्री सातव या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. सूत्रसंचालन आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नीता गावडे यांनी मानले.

पुढारी ११/०८/१८ पान ५

दै. पुण्यनगरी दि. ११/०८/१८ पान ५

# टीसी कॉलेजमध्ये स्मार्ट गर्ल कार्यशाळा

**बारामती : प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकातील भारत स्मार्ट सिटीकडे वळत असतानाच समाजातील युवतीदेखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हीच या शतकाची मोठी भरारी असेल, या उद्देशानेच भारतीय जैन संघटना आणि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोनदिवसीय 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळेस चांगला प्रतिसाद मिळाला.

दि. ७ आणि ८ ऑगस्ट रोजी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर

मुरुमकर होते. कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी उपस्थित युवतींना मार्गदर्शन केले. बारामती नगर परिषदेच्या सदस्या डॉ. सुहासिनी सातव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी अध्यक्षीय भाषणात स्मार्ट गर्ल या मूळ संकल्पनेचे विश्लेषण करीत स्मार्ट गर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे तर अंतरंगामध्ये बदल घडविणे कसे गरजेचे आहे हे ऐतिहासिक उदाहरणासह स्पष्ट केले. प्रा. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी सूत्रसंचालन केले. आभार नीता गावडे यांनी मानले.

पुण्यनगरी ११/०८/१८ पान ५

Tuljaram Chaturchand College Library Baramati

135
१५/१२/१८

पुण्य नगरी
शनिवार, ११ ऑगस्ट २०१८ | पुणे 5

# टीसी कॉलेजमध्ये स्मार्ट गर्ल कार्यशाळा

बारामती : प्रतिनिधी

एकविसाव्या शतकातील भारत स्मार्ट सिटीकडे वळत असतानाच समाजातील युवतीदेखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हीच या शतकाची मोठी भरारी असेल, या उद्देशानेच भारतीय जैन संघटना आणि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोनदिवसीय 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळेस चांगला प्रतिसाद मिळाला.

दि. ७ आणि ८ ऑगस्ट रोजी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी उपस्थित युवतींना मार्गदर्शन केले. बारामती नगर परिषदेच्या सदस्या डॉ. सुहासिनी सातव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी अध्यक्षीय भाषणात स्मार्ट गर्ल या मूळ संकल्पनेचे विश्लेषण करीत स्मार्ट गर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे तर अंतरंगामध्ये बदल घडविणे कसे गरजेचे आहे हे ऐतिहासिक उदाहरणासह स्पष्ट केले. प्रा. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी सूत्रसंचालन केले. आभार नीता गावडे यांनी मानले.

पुण्य नगरी ११।०८।१८

पुढारी | पुणे, शनिवार ११ ऑगस्ट २०१८ | ५

# 'टीसी' महाविद्यालयात स्मार्ट गर्ल कार्यशाळा

बारामती : प्रतिनिधी

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दोनदिवसीय स्मार्ट गर्ल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ महिलांनी मते व्यक्त केली.

एकविसाव्या शतकातील भारत स्मार्टसिटीकडे वळत असतानाच समाजातील युवतीदेखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हीच या शतकाची मोठी भरारी असेल, या उद्देशानेच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी उपस्थित महाविद्यालयातील युवतींना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून बारामतीच्या नगरसेविका डॉ. सुहासिनी सातव उपस्थित होत्या. आत्मविश्वासाची नितांत गरज स्पष्ट करताना खऱ्या स्मार्टगर्लने स्वतःवरील विश्वास कधीही ढळू न देता, स्वतःला नकारात्मक विचारांपासून कसे परावृत्त व्हावे, याविषयी युवतींसोबत संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्मार्टगर्ल या मूळ संकल्पनेचे विश्लेषण करीत स्मार्टगर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे, तर अंतरंगामध्ये बदल घडविणे कसे गरजेचे आहे हे ऐतिहासिक उदाहरणासहीत स्पष्ट केले. या कार्यशाळेसाठी जयश्री सातव या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. सूत्रसंचालन आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नीता गावडे यांनी मानले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

प्रभात पुणे, शनिवार, दि. ११ ऑगस्ट २०१८ | 07

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात कार्यशाळा

जळोची, दि. १० (वार्ताहर) - एकविसाव्या शतकातील भारत स्मार्ट सिटीकडे वळत असताना समाजातील युवती देखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हिच या शतकाची मोठी भरारी असेल. या उद्देशानेच भारतीय जैन संघटना आणि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी युवतींना मार्गदर्शन केले. नगरपरिषदेच्या सदस्या डॉ. सई सातव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर होते. प्रा. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले होते. आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी सूत्रसंचालन केले तर नीता गावडे यांनी आभार मानले.

प्रभात ११।०८।२०१८

मा. प्राचार्य साहेब.

लोकमत पुणे, रविवार, दि. १२ ऑगस्ट २०१८ ३

# 'स्मार्ट गर्ल' ॲप शाळांत पोहोचविणार

## प्रमोद काळे : आरोग्य, करिअर, सुरक्षा, आहार आदींबाबत होणार मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** महिला सक्षमीकरणासाठी आरोग्यापासून ते करिअरपर्यंत; तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या सुरक्षेसंदर्भात पुणे जिल्हा परिषदेने 'स्मार्ट गर्ल प्लस' ॲप्लिकेशन लाँच केले आहे. ते बारामती तालुक्यातील सर्व शाळा, तसेच महाविद्यालयांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे, अशी माहिती गटविकास अधिकारी प्रमोद काळे यांनी दिली.

रोजच्या धावपळीत महिला आणि मुलींना कितीतरी समस्यांना सामोरे जावे लागते. महिलांच्या या समस्यांवर मात करण्यासाठी 'स्मार्ट गर्ल प्लस'ॲप महत्त्वाची भूमिक बजावणार आहे. मासिक पाळी, आहार, सुरक्षा, स्वसंरक्षण, आरोग्य आदींबाबत महिला व मुलींना या ॲपद्वारे तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळणार आहे. महिलांचे मनोबल वाढवण्यासाठी या ॲपच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महिला वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काम करीत आहेत. तसेच, अनेक गृहिणी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पार पाडतात. अशा वेळी करिअरमधील समस्या, आरोग्य, शिक्षण आदी विषयांसंदर्भात अनेक समस्यांना महिला व मुलींना सामोरे जावे लागते. त्याचा परिणाम महिलांच्या आरोग्यावर, तसेच कौटुंबिक वाद, नैराश्य, मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. अशावेळी महिलांना समस्यांमधून बाहेर काढून भविष्यातील मोठ्या नुकसानीपासून वाचवण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती समुपदेशन करणार आहेत.

या ॲपद्वारे महिला आरोग्य, शिक्षण आणि करिअरसंबंधित विषयांवर प्रश्न विचारु शकतात. महिला ॲपमध्ये दिलेल्या नंबरवर एसएमएस करुन आपले प्रश्न विचारु शकतात. ॲपद्वारे प्रश्न विचारणाऱ्या महिला किंवा मुलींच्या माहितीसंबंधी गुप्तता बाळगली जाईल.



बारामती येथे स्मार्ट गर्ल कार्यशाळेत प्रा. वैशाली पोळ, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, जयश्री साळुंखे व उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळा

बारामती : भारत स्मार्ट सिटीकडे वळत असतानाच युवतीदेखील 'स्मार्ट गर्ल' म्हणून पुढे आल्या पाहिजेत, या उद्देशाने भारतीय जैन संघटना आणि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथे नुकतीच दोन दिवसीय 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून बारामती नगर परिषदेच्या सदस्या डॉ. सई सातव उपस्थित होत्या. वक्त्यांनी युवतींनी स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची नितांत गरज असल्याचे स्पष्ट केले. खऱ्या स्मार्ट गर्लने स्वत:ला नकारात्मक विचारांपासून कसे परावृत्त करावे, याविषयी संवाद साधला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर अध्यक्षस्थानी होते. त्यांनी स्मार्ट गर्ल या संकल्पनेचे विश्लेषण करुन स्मार्ट गर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे, तर अंतरंगामध्ये बदल घडविणे गरजेचे असल्याचे ऐतिहासिक उदाहरणासह स्पष्ट केले.

प्रा. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन केले. आरती खोत आणि सोनल ब्राह्मणकर यांनी सूत्रसंचालन केले. नीता गावडे यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दै. ऐक्य. दि- ११।८।२०१८

६ शनिवार, दि. ११ ऑगस्ट २०१८

## प्रा. निरंजन शहा यांना पीएच.डी.



▲ लोणंद, दि. १० : अनेकांत एज्युकेशन सोसायटी संचलित बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील प्रा. निरंजन रमेश शहा यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी पदवी प्रदान केली आहे.

'डेव्हलपिंग कन्झ्युमर सॅटिसफॅक्शन इंडेक्स फॉर मोबाईल सर्व्हिसेस ऑफर्ड बाय प्रायव्हेट सर्व्हिस प्रोव्हायडर्स-अ स्टडी' हा प्रा. निरंजन शहा यांच्या प्रबंधाचा विषय असून या विषयाच्या अभ्यासासाठी त्यांना अण्णासाहेब वाघिरे, आर्टस कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, ओतूर(पुणे) येथील प्रा. डॉ. जी.एम. डुंबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. निरंजन शहा हे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात अध्यापनाचे काम गेल्या ३ वर्षांपासून करत आहेत. त्यांनी राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध परिषदांमध्ये सहभागी होवून संशोधन प्रबंध सादर केले आहेत. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर शहा (वाघोलीकर) व अन्य संचालक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. प्रकाश मेहेर यांच्यासह प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी प्रा. निरंजन शहा यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College Library

ABS 13/8/18

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग — दि. १५-१६/८/२०१८

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात स्मार्ट गर्ल कार्यशाळा संपन्न

बारामती - एकविसाव्या शतकातील भारत स्मार्ट सिटीकडे वळत असतानाच समाजातील युवती देखील स्मार्ट गर्ल म्हणून पुढे आल्या पाहिजेत आणि हिच या शतकाची मोठी भरारी असेल. या उद्देशानेच भारतीय जैन संघटना आणि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय स्मार्ट गर्ल कार्यशाळा आयोजित केली गेली. ही कार्यशाळा दि.७ आणि ८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली.




स्मार्ट गर्ल कार्यशाळेत सौ. जयश्री साळुंखे. डॉ. मेधा शहा, सौ. माधुरी कुलकर्णी यांनी उपस्थित महाविद्यालयातील युवतींना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून बारामती नगरपरिषदेच्या सदस्या डॉ. सई सातव उपस्थित होत्या. आत्मविश्वासाची नितांत गरज स्पष्ट करताना खऱ्या स्मार्ट गर्लने स्वत:वरील विश्वास कधीही ढळू न देता, स्वत:ला नकारात्मक विचारांपासून कसे परावृत्त व्हावे याविषयी युवतींसोबत संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्मार्ट गर्ल या मूळ संकल्पनेचे विश्लेषण करत स्मार्ट गर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे तर अंतरंगामध्ये बदल घडविणे कसे गरजेचे आहे हे ऐतिहासिक उदाहरणासहित स्पष्ट केले.

प्रा. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. या कार्यशाळेत सौ. आरती खोत आणि सोनल ब्राम्हणकर यांनी सूत्रसंचालन केले तर उपस्थितांचे आभार सौ. नीता गावडे यांनी मानले. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

सकाळ Today | १
पुणे जिल्हा, रविवार, १२ ऑगस्ट २०१८

# मिळालेल्या संधीचे सोने करावे : साळुंके

ाल
ाची
ादन
तर्गत

पुणे जिल्ह्यातील स्मार्ट गर्ल कार्यशाळेच्या समुपदेशक व मार्गदर्शक म्हणून जयश्री साळुंके काम पाहतात. सर्वच क्षेत्रांत वेगाने बदल घडत असताना मुलीही बदलत्या काळात स्मार्ट व्हाव्यात या उद्देशाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व भारतीय जैन संघटनेच्या वतीने नुकतीच दोन दिवसांची स्मार्ट गर्ल कार्यशाळा आयोजित केली गेली. या कार्यशाळेत जयश्री साळुंखे, डॉ. मेधा शहा, माधुरी कुलकर्णी यांनी युवतींना मार्गदर्शन केले. नगरसेविका डॉ. सुहासिनी सातव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. साळुंके यांनी युवतींना अत्माजाणीव, आत्मसन्मान, स्वसंरक्षण, निवड आणि निर्णय तसेच मैत्री आणि मोह अशा विषयांवर मार्गदर्शन केले. माधुरी कुलकर्णी यांनी पालक आणि युवती यांच्यातील नातेसंबंध तसेच नातेसंबंधातील ताणतणावविरहित संवाद याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. मेधा शहा यांनी युवतींच्या मासिक पाळी आणि त्याबाबत घ्यावी लागणारी स्वच्छतेची काळजी, तसेच मासिक पाळी मागील शास्त्रीय कारणे याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. मुरुमकर यांनी स्मार्ट गर्ल होण्यासाठी केवळ बाह्यरंग नव्हे; तर अंतरंगांमध्ये बदल घडविणे गरजेचे आहे असे नमूद केले. वैशाली पोळ यांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वैशाली माळी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन केले. आरती खोत आणि सोनल ब्राह्मणकर यांनी सूत्रसंचालन केले. नीता गावडे यांनी आभार मानले.



बारामती : स्मार्ट गर्ल कार्यशाळेत (डावीकडून) वैशाली पोळ, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, जयश्री साळुंके व वैशाली माळी.

16/8/18

प्रा. २०।शिं। दि.७४।०२।१८ पान ८६

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आवार, बारामती (पुणे)**

फोन नं. (०२११२) २२१२०५, २२२७२८

## मुलींच्या वसतिगृहात सोलर सिस्टिम बसविणेबाबत


आमच्या संस्थेच्या मुलींच्या वसतिगृहातील २०० मुलींच्या नविन वसतिगृहातील विंगसाठी गरम पाण्याचे ट्युबिलर सोलर सिस्टिम बसविणेसंदर्भात निविदा मागविण्यात येत आहे. संबंधित पुरवठादारांनी जाहिरात प्रसिद्ध झालेपासून दोन दिवसात आपले दरपत्रक संस्था कार्यालयात पोहोच करावे.

**सचिव**

**अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती**

सा. आक्रोश : दि-१४/८/२०१८ पा.नं.१

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'योग व आधुनिक जीवनशैली कार्यशाळा' संपन्न



**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'डायनॅमिक योग व आधुनिक जीवनशैली कार्यशाळा' संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी बारामतीतील प्रसिद्ध डॉ.हिमगौरी वडगावकर या प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या. डॉ.हिमगौरी वडगावकर व प्रा.राजेंद्रकुमार डांगे यांनी आधुनिक बदलत्या जीवनशैलीमुळे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्यावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी ऋतुनुसार प्रथिने, पिष्टमय, स्निग्ध व क्षारयुक्त आहाराचा कसा समावेश करावा, याविषयी मार्गदर्शन केले. तसेच आसने, प्राणायाम, शुद्धीक्रिया, बंध, मुद्रा, योगनिद्रा याचे प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सचिन गाडेकर हे होते. अध्यक्षीय पदावरून बोलताना ते म्हणाले की, आरोग्यात डायनॅमिक योग ही काळाची गरज निर्माण झालेली आहे असे मत मांडले. याप्रसंगी विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ.समाधान पाटील, मानसशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विजयकुमार शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक योगा विभागप्रमुख प्रा.जगताप आर.डी. यांनी केले. या कार्यशाळेत योगा विभागातील एकूण १३० मुला-मुलींनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या आरोग्य जतनासाठी भविष्यात उपयोग होईल असे मत अनेक विद्यार्थ्यांनी मांडले. सूत्रसंचालन पुजा घोरपडे व मच्छिंद्र साळुंखे यांनी केले. आभार प्रा.ढमे जी.एम. यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी योगा व मानसशास्त्र विभागातील

This news already published on 6th March 2018.


मा. प्राचार्य साहेब.

सकाळ
गुरुवार, २३ ऑगस्ट २०१८ | ७

# विधायक मार्गाने भावना व्यक्त करा : डॉ. पखाले

इंदापूर, ता. २२ : "देशात काही विपरीत घडले, तर त्याची तीव्र प्रतिक्रिया इंदापुरात उमटते. त्याचा व्यापाऱ्यांसह सर्वांना त्रास होतो. त्यामुळे इंदापूर बंदऐवजी लोकशाहीतील विधायक मार्गाने नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात. त्यासाठी इंदापुरात आदर्श आचारसंहितेसंदर्भात विशेष बैठक घेण्यात येणार असल्याचे सूतोवाच बारामती विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांनी केले.

इंदापूर पोलीस ठाण्यात शांतता समितीच्या बैठकीत डॉ. पखाले बोलत होते. या वेळी मुकुंद शहा, भारतीय जैन संघटनेचे शहराध्यक्ष धरमचंद लोढा, धनंजय पाटील, सायरा आतार, दर्गा मशिद ट्रस्टचे विश्वस्त अस्लम जमादार, अरविंद वाघ, शिवराज परमार, अरबाज शेख उपस्थित होते.



बारामती : अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

पखाले म्हणाले, "कायद्याचे पालन न करता आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले, तर त्यांना सरकारी, तसेच खासगी नोकरी मिळण्यात अडचण येते. अजाणतेपणे कायदा भंग झाल्यास त्याचे दुष्परिणाम संपूर्ण कुटुंबास भोगावे लागतात. लोकशाहीत संप, बंद, चक्काजाम हे हत्यार आहेत. मात्र, त्याचा वापर करताना कर्तव्य व हक्क यामध्ये गफलत होऊ नये, याची दक्षता सर्वांनी घेणे गरजेचे आहे."

या वेळी तहसीलदार श्रीकांत पाटील, नगराध्यक्षा अंकिता शहा, नगर परिषद काँग्रेस गटनेते कैलास कदम, शेखर पाटील व पांडुरंग शिंदे, रमेश शिंदे, प्रशांत सिताप, अय्याज शेख, जकीर काझी, अस्लम बागवान यांनी विचार मांडले. इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक मधुकर पवार यांनी सूत्रसंचलन केले.

**सण एकत्र साजरे करा**

इंदापुरात हिंदू, मुस्लिम बांधव एकोप्याने एकमेकांचे सण साजरे करतात. यंदा गणेशोत्सव व मोहरम एकत्र येत आहेत. इंदापुरात एकाच मांडवात दोन्ही उत्सव साजरे करण्याचे लालबहादूर शास्त्री चौकात नियोजन आहे. हा उपक्रम संपूर्ण देशात इंदापूर पॅटर्न म्हणून ओळखला जाईल, असे डॉ. संदीप पखाले यांनी सांगताच उपस्थितांनी त्याचे टाळ्या वाजवून स्वागत केले.

Tuljaram Chaturchand College Library

ABS

# तु.च.महाविद्यालय व परिसरात ७८ रोडरोमिओंवर कारवाई; १९हजार वसूल

**बारामती:-** शाळा-महाविद्यालया भोवती फिरणाऱ्या रोडरोमिओंवर कठोर कारवाईचा बडगा शहर पोलिसांनी उगारला आहे. दोनच दिवसात ७८ दुचाकीस्वारांवर कारवाई करीत पोलिसांनी त्यांच्याकडून सुमारे १९ हजारांचा दंड वसूल केला. फॅन्सी नंबरप्लेट बसविलेल्यांवरही कारवाई करण्यात आली.


शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक अशोक धुमाळ यांनी ही माहिती दिली. उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर यांनी यासंबंधी उपविभागातील पोलिस ठाण्यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शहर पोलिस ठाण्याकडून आता धडक कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे.

शुक्रवारी या पथकाने शहरातील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयासमोर १९ दुचाकी चालकांवर कारवाई करत ६ हजारांचा दंड वसूल केला होता. शनिवारी (दि.२५) ५९ दुचाकी चालकांवर कारवाई करत त्यांच्याकडून १२ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. महाविद्यालयाच्या बाहेर रेंगाळणाऱ्या परंतू विद्यार्थी नसणाऱ्या १३ जणांना पोलिसांनी पकडले. त्यांच्यावर मुंबई पोलिस कायदा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक अश्विनी शेंडगे, उपनिरीक्षक नीलेश आपसुदे, भोसले, पोलिस नाईक रमेश केकाण, पोपट नाळे, निर्भया पथकाच्या अमृता भोईटे, अर्चना बनसोडे यांनी ही कारवाई केली.

शहरातील सर्व शाळा-महाविद्यालये, क्लासेस याठिकाणी ही कारवाई यापुढे सुरूच ठेवली जाणार असल्याचे पोलिस निरीक्षक धुमाळ यांनी सांगितले.

**पालकांवर गुन्हा दाखल करणार**

अल्पवयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना तसेच अन्य अल्पवयीनांना दुचाकी चालविण्यास दिल्याचे यापुढे आढळून आल्यास थेट पालकांवरच गुन्हे दाखल करण्याची भूमिका आम्ही घेतली आहे. त्यामुळे पालकांनी अल्पवयीन पाल्यांना दुचाकी वापरण्यास देऊ नये, असे आवाहन पोलिस निरीक्षक अशोक धुमाळ यांनी केले आहे.



## सीसीटीव्ही कॅमेरे 3 महिन्यात बसविण्याच्या सूचना

सर्वच शैक्षणिक संकुलात फिरून सीसीटीव्ही कॅमेरे आहेत का? असतील तर ते व्यवस्थित आहेत का? याचीही माहिती आता पोलिस संकलित करीत आहेत. काही नवीन ठिकाणी ९० दिवसात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्याच्या सूचनाही जिल्हा पोलिस अधिक्षक संदीप पाटील व पोलिसांनी केल्या आहेत. अन्यथा संस्थांवर कारवाई होणार आहे.

सा. रणशिंग . दि- ६।१।२०१८ . पा. नं- ११

साप्ताहिक रणशिंग

## बॅडमिंटन स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास दुहेरी मुकुट

बारामती - क्रीडा व यवुक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्याल, पुणे आयोजित तसेच १९ वर्षे वयोगटात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

बारामती तालुकास्तर बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुल, बारामती या ठिकाणी संपन्न झाली. अंतिम सामन्यात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या अनिकेत लोणकर याने सिंगल इव्हेंटमध्ये सरळ दोन सेट जिंकले तर ओमराज व्होरा व अनिकेत लोणकर या जोडीने डबल्स मध्ये सरळ दोन सेट जिंकत विजेतेपद प्राप्त केले. तर मुलींच्या संघातील श्रुती व्होरा हिने सिंगल इव्हेंट मध्ये विजेतेपद प्राप्त केले. तर डबल्समध्ये श्रेया गांधी व श्रुती व्होरा हिने या जोडीने सलग दोन सेट जिंकत विजेतेपद मिळवित महाविद्यालयास दुहेरी मुकुट प्राप्त करून दिला. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे.

सा: रणशिंग . दि- ६।१।१८ . पा: नं- ६

पान नं. ६

## तु. च. महाविद्यालय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजयी

बारामती - क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगट जिल्हास्तर स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

पुणे जिल्हास्तर सॉफ्टबॉल स्पर्धा नुकतीच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाली. अंतिम सामन्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी कॉलेज, जेजुरी.संघाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या मयूर भापकर, प्रथमेश कांबळे, मन्सूर आत्तार, मंथन भापकर, अनिकेत धुमाळ, संतोष कचरे, वैभव हगारे, अभिषेक होले व सुहास इंदापुरे यांनी सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत ८-० होमरनने सामना जिंकत महाविद्यालयाची विजयाची परंपरा कायम ठेवली. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

सा: रणशिंग · दि-६।९।२०१८ · पा: नं-2

Tuljaram Chaturchand College Library Baramati

## तु.च. महाविद्यालयातील पर्यावरण कार्यशाळा संपन्न

बारामती - पर्यावरण संवर्धन आणि जागरूकता या बाबत नेहमीच प्रयत्नशील असणाऱ्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात, कनिष्ठ विभागाच्या पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीने गार्डनिंग या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या मदतीने ही कार्यशाळा रविवार दि. २ सप्टेंबर २०१८ रोजी संपन्न झाली.

या कार्यशाळेचे आयोजन दोन सत्रांमध्ये करण्यात आले होते. पहिल्या सत्रात व्याख्याने तर दुसऱ्या सत्रात त्यासंबंधित प्रात्याक्षिके घेण्यात आली. पहिल्या सत्रात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी गार्डनिंग ॲन आर्ट या विषयावर व्याख्यान दिले तर विभागातील प्राध्यापक डॉ. एस.जे. चव्हाण यांनी गार्डन ट्रल्स एन्ड टेकनिक्स, डॉ. एम.बी. कानडे यांचे नीड्स एन्ड अपॉर्च्युनिटीज इन गार्डनिंग या विषयावर तर डॉ.आर.डी. चितळे यांचे इनडोअर एन्ड आऊटडोअर प्लांट्स या विषयावर व्याख्याने झाली. या सत्रातील अखेरचे व्याख्यान डॉ. एम.पी. पाटील यांनी सीड बॉल्स एन्ड पेपर बॅग्स या विषयावर दिले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात महाविद्यालयाच्या बॉटनिकल गार्डनमध्ये विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिके दाखविण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने रोपांसाठी कुंडी भरणे, रोपांचे कलम करणे, डोळा भरणे, गुटी करणे, ग्रॉफटिंग करणे, सीड बॉल बनविणे, पेपर बॅग बनविणे, नर्सरीमधील रोपे तयार करणे आदी विषयांचे प्रात्यांक्षिके करून दाखविण्यात आली. या कार्यशाळेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या ८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाच्या महत्वासोबतच रोपांचे संगोपन करणे, रोपांची निगा राखणे याविषयीची जागरूकता वाढण्यास मदत मिळाली.

या कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तर कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी, समन्वयक प्रा. राजेंद्र आगवणे, प्रा. गोरखनाथ मोरे यांचे सहकार्य लाभले. ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कनिष्ठ विभागाच्या पर्यावरण संवर्धन समितीच्या समन्वयक प्रा. अनिता पाटील आणि समिती सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. स्मिता मंगुडकर यांनी केले.

## अनेकान्तमध्ये विविध स्पर्धा संपन्न



बारामती - येथील अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विविध वेशभूषा स्पर्धेमध्ये विद्यार्थी प्रसिद्ध भारतीय खेळाडूंच्या वेषभूषेमध्ये आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी अनेक कलागुण सादर केले. या स्पर्धेसाठी सारीका शहा व अक्षरा सराफ हे परीक्षक म्हणून लाभले. यावेळी मराठी बडबडगीतांची स्पर्धाही पार पडली. यामध्ये विद्यार्थ्यांनी सुरेख गायन करून गीते सादर केली. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळत असल्याचे मत प्राचार्या राखी माथुर यांनी व्यक्त केले.

## मुलींनी मोह, प्रलोभन बळी पडू नये -अश्विनी शेंडगे

बारामती - शिक्षणासाठी महाविद्यालयात आल्यावर विद्यार्थिनींनी शिक्षणच घेतले पाहिजे असे उद्गार निर्भया पथकाच्या प्रमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. शेंडगे यांनी काढले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहात त्यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

आपले मित्र आणि मैत्री योग्य नसल्यास आपल्याला विविध धोक्यांना सामोरे जावे लागते. अनेक वेळा मुली आपल्या संदर्भातील होणारी छेडछाड भितीपोटी लपवून ठेवतात. यामुळे मुलींनी योग्य ती काळजी घ्यावी. तसेच मोह, प्रलोभन यांना बळी न पडता थोड्याशा मजेसाठी होवू शकणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव ठेवणे फार गरजेचे आहे. काही चुकांसाठी फार मोठी किंमत मोजावी लागते आणि त्यातून पुन्हा उभं राहायला फार काळ जावा लागतो. आजूबाजूंच्या नजरांबद्दल, स्पर्शांबद्दल सतर्क राहावे याची जाणीव करून दिली. फेसबुक, वॉटस अप, इंटरनेट, सिनेमा यांना बळी न पडता त्यातील चांगल्या गोष्टींचा योग्य वापर करून घेतला पाहिजे. आपल्या आयुष्यात आई-वडील व कुटुंबियांचा महत्त्वाचा वाटा असतो हेही त्यांनी आवर्जून नमूद केले. निर्भया पथकाचा उद्देश, हेतू व त्यांचे कार्य याची मुलींना सविस्तर माहिती दिली. मुलींना कोणी छेडछाड करीत असेल तर त्यांनी निर्भया पथकाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले. तसेच पोलीस मित्र म्हणून काम करण्यासाठी विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रंजना नेमाडे यांनी केले. आभार कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी यांनी केले. या व्याख्यानाचा लाभ सुमारे ६०० विद्यार्थिनींनी घेतला.

मा. प्राचार्य साहेब.

दि. ६/९/२०१८ साप्ताहिक २०शिंडा पान नं.९५.

# टी.सी. कॉलेजमध्ये संपूर्ण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

बारामती - स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना स्वतःला झोकून देऊन अभ्यास करा आणि अभ्यासांबाबतीत कसलीच तडजोड करू नका. स्पर्धा परीक्षांबाबत समाजामध्ये जे काही गैरसमज पसरले आहेत. नकारात्मक विचार पसरले आहेत. हे विचार आधी विद्यार्थ्यांनी सोडून द्यायला हवेत व आत्मविश्वासाने तयारी केली पाहिजे असा कानमंत्र पुण्याच्या ज्ञानोदय अॅकॅडमीचे संचालक निखील नानगुडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित संपूर्ण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर म्हणाले की, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन उपक्रमाकडे महाविद्यालय नेहमी एक विशेष मोहिम म्हणून पाहते. मार्गदर्शन केंद्र हे विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आवारातच एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून उपलब्ध आहे. प्रशासकीय सेवांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्वल करून समाजाची योग्य मार्गाने सेवा करावी. स्पर्धा परीक्षांमध्ये आपले प्रयत्न आजमावणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मागे महाविद्यालय उभे आहे. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात निखील नानगुडे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची ओळख, स्वरूप, प्रकार आदी बाबतीत मार्गदर्शन केले तर द्वितीय सत्रामध्ये प्रा. विजयसिंह घाडगे यांनी परीक्षांची तयारी, आवश्यक संदर्भ, ग्रंथ, वाचन-लेखन आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी ११ सूत्रांचा कानमंत्र देखील दिला. तत्पूर्वी कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे स्पर्धा परीक्षा विभागाचे समन्वयक डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी केले. यावेळी त्यांनी कार्यशाळेचा मूळ उद्देश व विभागाच्या भावी उपक्रमांचा आढावा घेतला. या कार्यशाळेस कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण ३८७ विद्यार्थ्यांनी आपला सक्रीय सहभाग नोंदवला. कार्यशाळेच्या अखेरीस आभार प्रदर्शन डॉ. मोहित राऊत यांनी केले.

पान. ९५

Tuljaram Chaturchand College
Library
★ Baramati ★

ADS
6/9/18

सा. रणशिंग - दि- १३/९/२०१८ - पा.नं-४



# तु.च. महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स विषयावर कार्यशाळा संपन्न

बारामती- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागांच्या वतीने ३० ते ३१ ऑगस्ट २०१८ रोजी आर्डीनो आय.ओ.टी. या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या नियमित अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त, सध्याच्या उद्योग विश्वातील बदलत्या तंत्रज्ञानाची (आय.ओ.टी.) ओळख व्हावी आणि नोकरी-व्यवसायात याचा त्यांना फायदा व्हावा या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. बी.आय.टी., इलेक्ट्रॉनिक सिस्टीम, बारामतीचे संचालक पी.डी. सवाणे आणि सहकारी ए.ए. शिंदे यांना या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आर्डीनो एन्ड आय.ओ.टी. बद्दलचे विविध पैलू, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील त्याचा वापर याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख डॉ. जगदीश देशपांडे यांनी आर्डीनो कंट्रोलर आणि आय.ओ.टी. या विषयावरील कार्यशाळेच्या नियोजानामागील भूमिका स्पष्ट केली. यासोबतच कार्यशाळेचे समन्वयक प्रा.एस.एच. गावडे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी विभागातील प्रा. पी.डी. रूपनवर आणि प्रा. पी.एम. जरांडे यांनी परिश्रम घेतले.

मा० प्राचार्य साहेब.

(3)
2018

दै. सकाळ दि. १९/०९/२०१८ पान ३

# टी. सी. महाविद्यालयाला विजेतेपद

**बारामती शहर, ता. १८ :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजित शालेय १७ व १९ वर्षे वयोगटात तालुकास्तर व जिल्हास्तर स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

तालुकास्तर कबड्डी स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुलात झाली. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने १९ वर्षे वयोगटात अंतिम सामन्यात शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर संघाबरोबर खेळताना विजेतेपद प्राप्त केले. या संघातील विद्या घाडगे, साक्षी काळे, गायत्री यादव, ऐश्वर्या झाडबुके, हर्षाली कारंडे, रितू बोराडे, अलिशा वाघमोडे, भाग्यश्री आटोळे, निकिता माळवे व यशश्री पोळ यांनी सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून महाविद्यालयाची विजयाची परंपरा कायम ठेवली.

मुलांच्या संघाने १७ वर्षे वयोगटात अंतिम सामन्यात बारामतीच्याच म.ए.सो. विद्यालयाच्या संघाबरोबर खेळताना विजेतेपद प्राप्त केले. या संघातील सुयश गाडेकर, सूरज गायकवाड, शुभम तावरे, अंशुमन गायकवाड, प्रथमेश थोरात, गणेश थोरात, सिद्धेश दाभाडे, सिद्धीराज मुरूमकर, रोहन नामदास, अनोज माने, ज्ञानेश्वर गावडे व प्रताप माने यांनी सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून महाविद्यालयाची विजयाची परंपरा कायम ठेवली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक गौतम जाधव, अशोक देवकर व शोभा मांगले यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी अभिनंदन केले.

दै. बारामती प्राईड दि. २१/०९/२०१८ पान ४

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

बारामती : प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्यावतीने बारामती परिसरातील प्राथमिक आणि माध्यमिक महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने थोर समाजसेवक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जयंती उत्सव सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्याची सुरुवात दि. २२ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी ७.३० वा. श्री छत्रपती शाहू हायस्कूल व ज्यू. कॉलेज, बारामती येथून होणार आहे. प्रसंगी, स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष सदाशिव सातव, सदस्य, जवाहर शाह (वाघोलीकर) सचिव, अनेकांत एज्युकेशन सोसायटी, डॉ.चंद्रशेखर मुरुमकर प्राचार्य, टी. सी. कॉलेज,



बारामती व माध्यमिक विद्यालयांचे प्राचार्य, सेवकवृंद तसेच विद्यार्थी यांचे हस्ते पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन होईल. त्यानंतर, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची बारामती शहरातून प्रभातफेरी काढण्यात येणार आहे. प्रभातफेरीमध्ये बारामती शहरातील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी व सेवकवर्ग यांचा समावेश राहील. राधेश्याम एन. आगरवाल टेक्निकल इन्स्टिट्यूट व ज्यू. कॉलेज, बारामती येथे कार्यक्रमाची सांगता होईल.

दरम्यान, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील संयुक्त जयंती समिती, बारामती यांच्या वतीने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण होईल. यावेळी शिक्षणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र कुंभार यांचे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जीवनकार्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

ABS
२१/९/

मा. प्राचार्य साहेब





बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महविद्यालयातील विविध प्रश्नांसाठी अभाविपकडून आंदोलन करण्यात आले.

# चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे हाल चव्हाट्यावर

## अभाविपने आंदोलनाद्वारे दिला अल्टिमेटम

जळोची, दि. १९ (वार्ताहर) - बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महविद्यालयात शौचालयाची दुरवस्था झाली असून महाविद्यालयात विविध प्रश्न प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहे. हे प्रश्न त्वरीत सोडविण्यात यावे, यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या बारामती शाखेकडून आंदोलन करून महाविद्यालयात जागे केले असून १५ दिवसांत जर विविध प्रश्न सुटले नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी अभाविपचे शशिकांत टिंगरे, प्रीतम मेहर, वैभव सोलनकर, शिवानी देवकर, प्रतीक धायगोडे, संदेश सूर्यवंशी व अन्य कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला तसेच या आंदोलनाला अनेक विद्यार्थ्यांनी पाठिंबा दिला. यावेळी महाविद्यालयातील शौचालय त्वरित दुरुस्त करावे आणि विद्यार्थ्यांची गैरसोय थांबवावी, ग्रंथालयातील मोडलेल्या सर्व खुर्च्या दुरुस्त कराव्या किंवा त्या नवीन द्याव्यात, कॉलेज कॅन्टीनमध्ये घरून आणलेला जेवणाचा डबा खाण्यास परवानगी द्यावी, कॉलेजमधील लॉन विद्यार्थ्यांना बसण्यासाठी खुले करावे, अपुऱ्या पार्किंगाची सुविधा पूर्ण करावी आदी मागण्या करण्यात आल्या. या मागण्या पूर्ण करण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाने १५ दिवसांचा कालावधी मागितल्यानंतर अभाविपने आंदोलन मागे घेतले व महाविद्यालय प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टीमेंटम दिला. जर महाविद्यालय प्रशासनाने पंधरा दिवसांत मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर अभाविप तीव्र आंदोलन करेल असा, सूचक इशारा महाविद्यालय प्रशासनाला देण्यात आला.

MBS 21/9

17



प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर विद्यार्थ्यांना शपथ देताना.

# तु. च. महाविद्यालयात स्वच्छता अभियान

**बारामती : प्रतिनिधी**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान 'स्वच्छता हीच सेवा' हे अभियान राबविण्यात येत आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची यंदा १५० वी जयंती साजरी होत आहे. या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छताविषयक हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यावेळी स्वच्छता रॅली काढण्यात आली. त्यावेळी शहरातील विविध गणपती विसर्जन ठिकाणे, सरकारी रुग्णालय, रेल्वे ग्राऊंड परिसराची स्वच्छता केली. या पहिल्या दिवसाच्या अंती महाविद्यालयातील २०० विविध स्वयंसेवकांनी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या उपस्थितीमध्ये स्वच्छतेविषयी प्रतिज्ञा घेतली.

महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळाचे प्रा. संजय काळे, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा. विवेक बळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. विलास कर्डिले, डॉ. चंद्रकांत कांबळे, प्रा. वैभव लांडगे यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले. याशिवाय या उपक्रमासाठी बारामती नगरपरिषदेचे नारखेडे आणि सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलच्या डॉ. प्रतिभा दाते यांचे विशेष सहकार्य लाभले.

# टी. सी. महाविद्यालयात 'स्वच्छता हिच सेवा' उपक्रम उत्साहात

**बारामती : वार्ताहर**

यंदा महात्मा गांधीजींची १५० वी जयंती देशभरात साजरी केली जाणार आहे. या अनुषंगाने संपूर्ण देशभरामध्ये ङ्गस्वच्छता हीच सेवाफ हे अभियान राबविले जात आहे. त्याअनुषंगाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ङ्गस्वच्छता हीच सेवाफ हा उपक्रम २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान महाविद्यालयात राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या वतीने स्वच्छता रॅलीने झाली.

त्यानुसार, बारामती शहरातील विविध गणपती विसर्जन ठिकाणे, सरकारी दवाखाना, रेल्वे ग्राऊंड परिसर स्वच्छ करण्यात आले. पहिल्या दिवसाच्या शेवटी महाविद्यालयातील २०० स्वयंसेवकांनी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या उपस्थितीत स्वच्छतेविषयी प्रतिज्ञा घेतली.

विद्यार्थी विकास मंडळाचे प्रा. संजय काळे, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा. विवेक बळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. विलास कर्डिले, डॉ. चंद्रकांत कांबळे, प्रा. वैभव लांडगे यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले.

.बारामती नगर परिषदेचे नारखेडे, सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलच्या डॉ. प्रतिभा दाते यांचे विशेष सहकार्य लाभले.



विद्यार्थ्यांना शपथ देताना प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

साप्ताहिक रणशिंग दि-२७/०९/२०१८ पान.नं.४
पान.नं.६.

साप्ताहिक रणशिंग

## अनेकान्त स्कूलमध्ये डिजिटल मेडिकल चेकअप

बारामती - येथील अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये फिजिओसेल कार्पोरेट प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांची डिजिटल मेडीकल चेकअप प्रक्रिया पार पडली. यामध्ये पाच स्क्रीनिंग, डेंटल स्क्रीनिंग, बायोमेट्रिक स्क्रीनिंग इ. चाचण्या घेण्यात आल्या. ही एक आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली आहे. बारामतीमध्ये सर्वप्रथम हा यशस्वी प्रयोग या स्कूलमध्ये घेण्यात आला.

नेत्र तपासणी, दंत तपासणी व बायोमेट्रिक इ. तपासण्या पद्धावर केल्या जातात. लहान मुलांना आरोग्याशी संबंधित समस्या व अडचणी सांगता येत नाहीत. मशीन स्वतः या समस्यांचा शोध घेते. म्हणून ही प्रणाली विकसित केली गेली आहे. स्क्रीनिंग हे सर्व प्रकारच्या लक्षणीय रोगाची काळजी घेण्यासाठी उपयुक्त आहे. कंपनीचे मुख्य अधिकारी डॉ. वरूण पाटीदार यांनी तपासणीसाठी वापरण्यात येणाऱ्या नवीन यंत्रांविषयी पालकांना माहिती दिली. तसेच पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. मुलांच्या दंत तपासणीसाठी इंट्रा ओरल कॅमेरा वापरण्यात आला व ज्यामुळे दातांमध्ये असणारी छिद्र व इत समस्या फोटो स्वरूपात पाहता येत होत्य

पान नं. ६

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत अनेकान्तची अप्रतिम कामगिरी

बारामती - क्रिडा व युवक सेवा संचनालय पुणे व जिल्हा परिषद पुणे आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत येथील अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलचा विद्यार्थी कृष्णा जाधव याने १४ वर्षाखालील वयोगटात मुलांच्या रायफल शुटींग स्पर्धेत जिल्हास्तरीय तृतीय क्रमांक मिळवून कांस्यपदक पटकावले. पुढील विभागीय शालेय नेमबाजी स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

तसेच जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये कु. कैरवी वैद्य हिने पाचवा क्रमांक मिळविला. सन्मानचिन्ह देऊन तिला गौरवण्यात आले. स्कूलचे अध्यक्ष श्री. मिलिंद शहा (वाघोलीकर) व प्राचार्या राखी माथुर यांनी दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College
Library
* Baramati *

दै. बारामती प्राईड दि. २७/०९/२०१८ पान नं. ४

# टी. सी. महाविद्यालयात 'स्वच्छता हिच सेवा' उपक्रम उत्साहात

बारामती : वार्ताहर

यंदा महात्मा गांधीजींची १५० वी जयंती देशभरात साजरी केली जाणार आहे. या अनुषंगाने संपूर्ण देशभरामध्ये ङ्गस्वच्छता हीच सेवाफ हे अभियान राबविले जात आहे. त्याअनुषंगाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ङ्गस्वच्छता हीच सेवाफहा उपक्रम २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान महाविद्यालयात राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या वतीने स्वच्छता रॅलीने झाली.

त्यानुसार, बारामती शहरातील विविध गणपती विसर्जन ठिकाणे, सरकारी दवाखाना, रेल्वे ग्राऊंड परिसर स्वच्छ करण्यात आले. पहिल्या दिवसाच्या शेवटी महाविद्यालयातील २०० स्वयंसेवकांनी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या उपस्थितीत स्वच्छतेविषयी प्रतिज्ञा घेतली.

विद्यार्थी विकास मंडळाचे प्रा. संजय कोंळे, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा. विवेक बळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. विलास कर्डिले, डॉ. चंद्रकांत कांबळे, प्रा. वैभव लांडगे यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले.

बारामती नगर परिषदेचे नारखेडे, सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलच्या डॉ. प्रतिभा दाते यांचे विशेष सहकार्य लाभले.



विद्यार्थ्यांना शपथ देताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

## विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला टी.सी. कॉलेजमध्ये नेहमीच प्राधान्य - जवाहर शाह

बारामती - बारामती परिसरात सातत्याने गुणवत्ता टिकवून असणारे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे नेहमीच विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी जागरूक राहिलेले आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनी महाविद्यालयात शिक्षण घेतात. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला महाविद्यालयाने नेहमीच अग्रक्रम दिला असल्याचे मत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर यांनी मांडले. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या विद्यार्थिनी सुरक्षितता व सद्यस्थिती सहविचार सभेत ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी महाविद्यालय परिसरात मुलींवर कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन केला जाणार नाही, याशिवाय चुकूनही असा प्रकार घडल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा ही दिला. या सहविचार सभेमध्ये बारामती पोलिस विभागाच्यावतीने सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीमती भोईटे आणि निर्भया पथकाच्या प्रमुख, सहाय्यक पोलिस निरीक्षक अश्विनी शेंडगे उपस्थित होत्या. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत नेहमीच आग्रही व दक्ष असल्याचे म्हटले. याबाबतीत सातत्याने महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी विविध कार्यशाळा, शिबिरे आणि प्रेरणादायी व्याख्यानांचे आयोजन केले जाते. या सोबतच पोलीस विभागाचे सहकार्य देखील तितकेच गरजेचे आहे. केवळ विद्यार्थिनींचे समुपदेशन करण्यापेक्षा विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे ही आजची गरज असल्यांचे ते पुढे म्हणाले. समाजातील सर्व महिला आणि मुलींच्या सुरक्षेसाठी निर्भया पथक सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. विद्यार्थिनींनी आपल्या समस्यांबाबत प्राध्यापकांबरोबर मोकळेपणाने व्यक्त करांव्यात. त्यानंतर येणाऱ्या अडचणी पथकास कळवल्यास त्यांच्या सुरक्षेसाठी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन निर्भया पथकाच्या प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी शेंडगे यांनी याप्रसंगी दिले.

महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी महाविद्यालयाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा या प्रसंगी घेतला. सिक्युरिटी गार्डस, सीसीटीव्ही कॅमेरे आदी उपायांनी केम्पस सुरक्षित असून, महाविद्यालयीन प्रशासन सुरक्षेसाठी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या सहविचार सभेस संस्थेचे ज्येष्ठ सदस्य विकास शहा लेंगरेकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अजित तेलवे, कनिष्ठ विभागाचे समन्वयक प्रा. राजेंद्र आगवणे, प्रा. गोरखनाथ मोरे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. संजय शेंडे यांनी केले

सकाळ
बुधवार, २९ ऑगस्ट २०१८ | ५

## आरती एकाड यांचे पॉवरलिफ्टिंगमध्ये यश



आरती पाटील

बारामती शहर, ता. २८ : येथील अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा शिक्षिका आरती वैभव एकाड पाटील यांना राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ब्राँझपदक प्राप्त झाले.

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या मान्यतेने पुण्यात नुकत्याच या स्पर्धा झाल्या. यात ७२ किलो वजनी गटात एकाड पाटील यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. या स्पर्धेत त्यांनी पुणे जिल्ह्याचे नेतृत्वही केले होते. त्यांचे पती वैभव एकाड यांनी त्यांना सहकार्य केले. संस्थेचे प्रमुख मिलिंद वाघोलीकर व प्राचार्या राखी माथूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## 'टीसी'च्या कुस्तीगिरांची बाजी

**बारामती शहर, ता. २८ :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्यातर्फे आयोजित शालेय १७ व १९ वर्षे वयोगटातील मुलांच्या कुस्ती स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मल्लांनी यश संपादन केले.

बारामती तालुकास्तर कुस्ती स्पर्धेत श्रीकांत धापटे (५० किलो), सौरभ डाळ (७४ किलो), शुभम शिंदे (७६ किलो), अभिषेक देवकाते (९६ किलो), विशाल घाडगे (८४ किलो) या सर्व खेळाडूंनी फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. सौरभ शेलार (५४ किलो), वैष्णव शिंदे (५८ किलो) या खेळाडूंनी ग्रीकोरोमन कुस्तीत प्रथम क्रमांक प्राप्त केला. सर्व खेळाडूंची इंदापूर येथे होणाऱ्या जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक गौतम जाधव, अशोक देवकर व शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अभिनंदन केले.

मा० प्राचार्य साहेब,

पुढारी ३०/८/१८ पान ३

## क्रीडा स्पर्धेत 'टीसी' महाविद्यालयाचे यश

**बारामती :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांच्या वतीने बारामतीत आयोजित तालुकास्तरीय १७ ते १९ वर्ष वयोगट मुलांच्या कुस्ती स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत श्रीकांत धापटे, सौरभ डाळ, शुभम शिंदे, अभिषेक देवकाते, विशाल घाडगे यांनी फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. सौरभ शेलार, वैष्णव शिंदे यांनी ग्रीकोरोमन कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. इंदापूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी या मल्लांची निवड झाली आहे. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर, प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर आदींनी अभिनंदन केले.

सा. रणझिंग टि ३०/८/१८ पान २

## तु. च.महाविद्यालयाच्या मल्लांचे कुस्ती स्पर्धेत य

बारामती - क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १७ व १९ वर्षे वयोगट मुलांच्या कुस्ती स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मल्लांनी उल्लेखनीय यश संपादन केले. बारामती तालुकास्तर कुस्ती स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुल, बारामती या ठिकाणी संपन्न झाली. या स्पर्धेत श्रीकांत धापटे-५० कि.ग्रॅ., सौरभ डाळ-७४ कि.ग्रॅ., शुभम शिंदे-७६ कि.ग्रॅ., अभिषेक देवकाते-९६ कि.ग्रॅ., विशाल घाडगे-८४ कि.ग्रॅ. या सर्व खेळाडूंनी फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे. सौरभ शेलार-५४ कि.ग्रॅ., वैष्णव शिंदे-५८ कि.ग्रॅ. या खेळाडूंनी ग्रीकोरोमन कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे. वरील सर्व खेळाडूंची इंदापूर येथे होणाऱ्या जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

# टी.सी. कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त

# प.पू यशाजी महाराजसाहेब याचे प्रबोधनपर अभिभाषण



**बारामती :** बारामतीमधील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये ७२वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे जेष्ठ सदस्य विकास शहा लेंगरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विकास शहा लेंगरेकर यांनी एनसीसी कॅडेट्सना शपथ दिली. त्याचसोबत राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनाची घोषणाही करण्यात आली. स्वातंत्र्यदिनानिमित्त महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी ८.०० वाजता झालेल्या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री जवाहर शाह(वाघोलीकर) तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत आचार्य चंदना महाराजसाहेब यांच्या शिष्या प.पू. यशाजी महाराज साहेब आणि प.पू रोहिणी महाराज साहेब यांचे प्रबोधनपर भाषण आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना प.पू.यशाजी महाराज साहेब यांनी भगवान महावीरांच्या मानवतावादी संदेशाचे अंतरंग उलगडून सांगितले. स्वातंत्र्य म्हणजे सर्वांना समान जगण्याचा अधिकार आहे, आपले स्वातंत्र्य आणि अस्तित्व जपताना इतरांच्या स्वातंत्र्याचा आणि अस्तित्वाचा आपल्याला विसर पडू नये. इतरांवर प्रेम करणे हाच मानवाचा मुलभूत भाव असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

अनेकांत एज्युकेशन सोसायटी ही विद्यार्थीरुपी कल्पवृक्ष तयार करणारी संस्था असल्याचे गौरवोद्गार त्यांनी या प्रसंगी काढले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सदस्य मिलिंद शाह वाघोलीकर यांनी केले. संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर) यांनी प.पू. यशाजी महाराज साहेब आणि प.पू रोहिणी महाराज साहेब यांचा सन्मान केला. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी आभार व्यक्त केले. महाविद्यालयात झालेल्या या समारंभात सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या

सकाळ · दि-१|९|२०१८ पा. नं-५

## टीसी कॉलेजची बॅडमिंटनमध्ये बाजी

**बारामती शहर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय बॅडमिंटन स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले. बारामती तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथे पार पडली. अंतिम सामन्यात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या अनिकेत लोणकर याने सिंगल इव्हेंटमध्ये सरळ दोन सेट जिंकले. ओमराज व्होरा व अनिकेत लोणकर या जोडीने डबल्समध्ये सरळ दोन सेट जिंकत विजेतेपद पटकावले; तर मुलींच्या संघातील श्रुती व्होरा हिने सिंगल इव्हेंटमध्ये विजेतेपद प्राप्त केले. डबल्समध्ये श्रेया गांधी व श्रुती व्होरा हिने या जोडीने सलग दोन सेट जिंकत विजेतेपद मिळवीत महाविद्यालयास दुहेरी मुकुट प्राप्त करून दिला. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक गौतम जाधव, अशोक देवकर व शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

सा-आक्रोश दि-२३|८|२०१८. पा. नं-१

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण संपन्न



**बारामती :** बारामतीमधील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये ७२ वा स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धित आणि पर्यावरण पूरक भारत हे उद्दिष्ट बाळगत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव जवाहर शाह(वाघोलीकर) यांच्या शुभहस्ते वृक्षारोपणाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी, तसेच वृक्षसंवर्धनाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा या हेतूने तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयाचे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. उपक्रमांतर्गत २७ वेगवेगळ्या रोपांच्या जातीचे वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, संस्थेचे सदस्य मिलिंद शाह वाघोलीकर, विकास शहा लेंगरेकर, डॉ.छाजेड आदी मान्यवरांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले.

हा स्तुत्य उपक्रम पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी, समन्वयक प्रा. राजेंद्र आगवणे, प्रा. गोरखनाथ मोरे यांनी सहकार्य लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यावरण संवर्धन समितीच्या समन्वयक प्रा. अनिता पाटील, समिती सदस्य, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

. मा: प्राचार्य साहेब.

माय पुणे जिल्हा | पुढारी | पुणे, शनिवार १ सप्टेंबर २०१८

वल्ह तालुक्याचा गौरव व सत्कार करण्यात येणार आहे.

## ...सी' महाविद्यालय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजयी

**बारामती :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगट जिल्हास्तर सॉफ्टबॉल स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले. पुणे जिल्हास्तर सॉफ्टबॉल स्पर्धा नुकतीच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झाली. अंतिम सामन्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी कॉलेज, जेजुरी संघाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या मयूर भापकर, प्रथमेश कांबळे, मन्सूर आत्तार, मंथन भापकर, अनिकेत धुमाळ, संतोष कचरे, वैभव हगारे, अभिषेक होले व सुहास इंदापुरे यांनी सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत ८-० होमरनने सामना जिंकत महाविद्यालयाची विजयाची परंपरा कायम ठेवली. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे.

9911665425

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै- पुढारी- दि- ७।९।२०१८- पा. नं-५

# 'टी.सी.' महाविद्यालयाला विजेतेपद

**बारामती : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगटात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

बारामती तालुकास्तर बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथे पार पडली. अंतिम सामन्यात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या अनिकेत लोणकर याने सिंगल इव्हेंटमध्ये सरळ दोन सेट जिंकले. तर ओमराज व्होरा व अनिकेत लोणकर या जोडीने डबल्समध्ये सरळ दोन सेट जिंकत विजेतेपद प्राप्त केले. तर मुलींच्या संघातील श्रुती व्होरा हिने सिंगल इव्हेंट मध्ये विजेतेपद प्राप्त केले.

डबल्समध्ये श्रेया गांधी व श्रुती व्होरा हिने या जोडीने सलग दोन सेट जिंकत विजेतेपद मिळवित महाविद्यालयास दुहेरी मुकुट प्राप्त करून दिला.

या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले.

पुढारी ७।९।१८ पा.नं ५

ABS 3/9

प्रा०प्राचार्य सा१८१

दैनिक सकाळ ९/०८/१८ पानं ४

## टीसी कॉलेजची बॅडमिंटनमध्ये बाजी

**बारामती शहर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय बॅडमिंटन स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले. बारामती तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथे पार पडली. अंतिम सामन्यात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या अनिकेत लोणकर याने सिंगल इव्हेंटमध्ये सरळ दोन सेट जिंकले. ओमराज व्होरा व अनिकेत लोणकर या जोडीने डबल्समध्ये सरळ दोन सेट जिंकत विजेतेपद पटकावले; तर मुलींच्या संघातील श्रुती व्होरा हिने सिंगल इव्हेंटमध्ये विजेतेपद प्राप्त केले. डबल्समध्ये श्रेया गांधी व श्रुती व्होरा हिने या जोडीने सलग दोन सेट जिंकत विजेतेपद मिळवीत महाविद्यालयास दुहेरी मुकुट प्राप्त करून दिला. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक गौतम जाधव, अशोक देवकर व शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी अभिनंदन केले. सकाळ ९/०८/१८ पान ४

दैनिक पुढारी ९/०८/१८

## 'टी.सी.' महाविद्यालयाला विजेतेपद

**बारामती : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगटात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

बारामती तालुकास्तर बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथे पार पडली. अंतिम सामन्यात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या अनिकेत लोणकर याने सिंगल इव्हेंटमध्ये सरळ दोन सेट जिंकले. तर ओमराज व्होरा व अनिकेत लोणकर या जोडीने डबल्समध्ये सरळ दोन सेट जिंकत विजेतेपद प्राप्त केले. तर मुलींच्या संघातील श्रुती व्होरा हिने सिंगल इव्हेंट मध्ये विजेतेपद प्राप्त केले.

डबल्समध्ये श्रेया गांधी व श्रुती व्होरा हिने या जोडीने सलग दोन सेट जिंकत विजेतेपद मिळवित महाविद्यालयास दुहेरी मुकुट प्राप्त करून दिला.

या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले. पुढारी ९/०८/१८

दैनिक पुढारी ९/०८/१८ पानं ३

## 'टीसी' महाविद्यालय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजयी

**बारामती :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित शालेय १९ वर्षे वयोगट जिल्हास्तर सॉफ्टबॉल स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले. पुणे जिल्हास्तर सॉफ्टबॉल स्पर्धा नुकतीच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झाली. अंतिम सामन्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी कॉलेज, जेजुरी संघाबरोबर खेळताना महाविद्यालयाच्या मयूर भापकर, प्रथमेश कांबळे, मन्सूर आत्तार, मंथन भापकर, अनिकेत धुमाळ, संतोष कचरे, वैभव हगारे, अभिषेक होले व सुहास इंदापुरे यांनी सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत ८-० होमरनने सामना जिंकत महाविद्यालयाची विजयाची परंपरा कायम ठेवली. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे. पुढारी ९/०८/१८ पान ३

ABS
३/९१

सकाळ
मंगळवार, ९ ऑक्टोबर २०१८ | ७

# टीसी महाविद्यालयाला विजेतेपद

## वक्तृत्व स्पर्धेत गिरिजा महामुनी, वादविवादमध्ये रितेश साळवे, स्वाती कडू प्रथम

**बारामती शहर, ता. ८ :** कविवर्य मोरोपंत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेत यंदा तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या गिरिजा महामुनी हिने वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. वादविवाद स्पर्धेतही याच महाविद्यालयातील रितेश साळवे व स्वाती कडू यांच्या संघाने विजेतेपद मिळविले. स्पर्धेचे यंदाचे ४६ वे वर्ष होते. उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचा कृष्णा तवले याने प्रथम बक्षीस मिळविले.

मोरोपंत वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून महाविद्यालयाने खऱ्या अर्थाने संस्कृती टिकविण्याचे काम केल्याचे गौरवोद्गार डॉ. प्रकाश पवार यांनी काढले. विकास शहा (लेंगरेकर) यांनी सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या मोरोपंत स्पर्धेने महाराष्ट्राला अनेक नामवंत वक्ते दिल्याचे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी स्वागत केले. प्रा. सुशील देशमुख यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. डॉ. सीमा गोसावी आणि डॉ. सुहास राऊत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुनील खामगळ यांनी आभार मानले. सदानंद करंदीकर, डॉ. गणेश राऊत, ज्योती जोशी, संजय सागडे, दामोदर मकाशर, सुप्रिया खाडिलकर यांनी परीक्षण केले.

स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे : वक्तृत्व (कनिष्ठ) प्रथम क्रमांक - राधेश्याम सुभेदार, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती. द्वितीय क्रमांक - शिवानी कांबळे, ज्ञानसंवर्धिनी ज्यु. कॉलेज, शिरवळ, तृतीय क्रमांक - पराग बद्रिके, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

वक्तृत्व (वरिष्ठ) प्रथम क्रमांक - गिरिजा महामुनी, टीसी महाविद्यालय बारामती, द्वितीय क्रमांक - हणुमंत देवकाते यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, पुणे, तृतीय क्रमांक - अनिकेत शिंदे, कृषी महाविद्यालय, बारामती - वादविवाद स्पर्धा प्रथम क्रमांक टीसी महाविद्यालय, बारामती संघ द्वितीय क्रमांक कृषी महाविद्यालय, बारामती संघ, उत्स्फूर्त स्पर्धा - द्वितीय क्रमांक सुमीत भोसले, राजमोहिते पाटील बीबीए अकलूज, तृतीय क्रमांक काजल बोरस्ते, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

### कविवर्य मोरोपंत स्पर्धा



**बारामती : कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना टीसी महाविद्यालयाची गिरिजा महामुनी.**

Tuljaram Chaturchand College Library Baramati

पुढारी | पुणे, सोमवार
८ ऑक्टोबर २०१८ पान 2

# टीसी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोरोपंत स्पर्धेत प्रथम

बारामती : प्रतिनिधी

बारामती नगरपरिषद व तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४६ व्या राज्यस्तरीय कविवर्य मोरोपंत स्पर्धेच्या कनिष्ठ गटात राधेश्याम सुभेदार तर वरिष्ठ गटात गिरीजा महामुनी हिने प्रथम क्रमांक मिळविला. हे दोन्ही विद्यार्थी याच महाविद्यालयाचे आहेत.

वादविवाद स्पर्धेतही या महाविद्यालयाच्या रितेश साळवे आणि स्वाती कडू यांनी विजेतेपद पटकावले. वक्तृत्वाचा कस लागणाऱ्या उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालाच्या कृष्णा तवले याने पटकावले. राजकीय अभ्यासक व शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार व विकास शहा यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालयीन गटात दुसरा क्रमांक शिरवळच्या ज्ञानसंवर्धिनी महाविद्यालयाच्या शिवानी कांबळे हिने मिळविला. तृतीय क्रमांक टी.सी.च्या पराग बद्रिके याने मिळविला.

वरिष्ठ महाविद्यालयीन गटात दुसरा क्रमांक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या हनुमंत देवकाते याने मिळविला. बारामती कृषि महाविद्यालयाच्या अनिकेत शिंदे याने तृतीय क्रमांक मिळविला. उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत अकलूजच्या मोहिते पाटील कॉलेजच्या सुमीत भोसले याने तर तृतीय क्रमांक नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या काजल बोरस्ते हिने मिळविला. मोरोपंतांच्या विषयावर वरिष्ठ महाविद्यालय गटात हनुमंत देवकाते तर कनिष्ठ महाविद्यालय गटात गरवारे महाविद्यालयाच्या आदित्य माने याने प्रथम क्रमांक मिळविला. राज्यातील विविध महाविद्यालयांमधील ९९ स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण सदानंद करंदीकर, डॉ. गणेश राऊत, ज्योती जोशी, संजय सागडे, दामोदर मकाशर, सुप्रिया खाडीलकर आदींनी केले.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. सीमा गोसावी व डॉ. सुहास राऊत यांनी केले. डॉ. सुनील खामगळ यांनी आभार मानले.



कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या गिरीजा महामुनी हिला पारितोषिक देताना मान्यवर.

Tuljaram Chaturchand College • Baramati • Library

मा० प्राचार्य साहेब.

सकाळ दि ५/१०/१८ पान ५

# टीसी महाविद्यालयामध्ये ग्राहक जागरूकता कार्यशाळा

**बारामती शहर, ता. १४ :** येथील तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वाणिज्य विभाग व मुंबईस्थित कन्झ्युमर गायडन्स सोसायटी यांच्या वतीने 'ग्राहक जागरूकता व आर्थिक साक्षरता' यावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती.

या प्रसंगी कन्झ्युमर गायडन्स सोसायटीचे सदस्य सुरेश कामत म्हणाले की, विद्यार्थ्यांनी गुंतवणूक नोकरी लागल्यापासूनच केली पाहिजे. त्याचा त्यांना भविष्यात फायदा होईल. कामत यांनी वॉरन बफे यांचे उदाहरण दिले की, जर व्यक्तीने आपल्या उत्पन्नाच्या ३० टक्के रक्कम गुंतवणूक केल्यास त्यांचे जीवन सुखकर होईल. या वेळी त्यांनी विविध गुंतवणुकीच्या पर्यायांचीही माहिती दिली.

मनोज पवार यांनी ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी तक्रारी पुराव्यासहित सादर केल्या पाहिजेत. दरम्यान, चित्रफितीद्वारे ग्राहकांची फसवणूक, तक्रार निवारण यंत्रणा, न्याय-निवाडे यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन व्ही. ए. बळे यांनी केले. तर एम. बी. भोसले, एस. टी. हिवरकर व एम. एस. फुले यांनी मोलाचे सहकार्य केले. वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक व ४७० विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर आणि वाणिज्य विभाग प्रमुख प्रकाश मेहेर यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र साळवे यांनी केले, तर ऋतुजा झगडे हिने आभार मानले.

पुढारी | पुणे, शनिवार १३ ऑक्टोबर २०१८

# टी. सी. महाविद्यालयात कार्यशाळा

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद (टी.सी.)महाविद्यालय व कन्झ्युमर गाइडन्स सोसायटी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्राहक जागरुकता व आर्थिक साक्षरता' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कन्झ्युमर गाइडन्स सोसायटीचे सदस्य सुरेश कामत या वेळी मार्गदर्शन करताना म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपली गुंतवणूक नोकरी लागल्यापासूनच केली पाहिजे. त्याचा त्यांना भविष्यात उत्तम फायदा होऊ शकतो. यासाठी त्यांनी वॉरन बफे यांचे उदाहरण दिले. व्यक्तीने आपल्या उत्पन्नाच्या ३० टक्के रक्कम गुंतवणूक केल्यास त्याचे जीवन सुखकर होईल. त्यांनी विविध गुंतवणुकीच्या पर्यायांची माहिती दिली. मनोज पवार यांनी ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी तक्रारी पुराव्यासहित सादर केल्या पाहिजेत. त्यासाठी पुरावा खरा असणे आवश्यक असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. व्ही. ए. बळे यांनी केले. प्रा. एम. बी. भोसले, प्रा. एस. टी. हिवरकर व प्रा. एम. एस. फुले यांनी मोलाचे सहकार्य केले. वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक व ४७० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर आणि वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रकाश मेहेर यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक प्रा. महेंद्र आर. साळवे यांनी केले. ऋतुजा झगडे हिने आभार मानले.

ABS 15/10/17

९८१
६९१

मा. प्राचार्य साहेब

सा. रणशिंग दि. १३/१२/२०१८ पा.नं. १०

# टी सी च्या सर्वेश गोसावी या विद्यार्थ्याचे युरोप येथे पुस्तक प्रकाशित

बारामती - टीसी महाविद्यालयात इंग्रजी विभागामध्ये शिक्षण घेत असलेला सर्वेश सीताराम गोसावी या विद्यार्थ्याचे कॅथेरीन मॅन्सफिल्ड अँण्ड लिटील बीइंग्स हे पुस्तक लाम्बेर्त अँकेडेमिक पब्लिशिंग, मोलडोवा, युरोप येथील आंतरराष्ट्रीय प्रकाशनाने नुकतेच प्रकाशित केले आहे. याकरिता इंग्रजी विभागाचे डॉ.सचिन गाडेकर, डॉ.शशांक माने, प्रो.संदेश राठोड यांचे विशेष सहकार्य लाभले. आंतरराष्ट्रीय स्तरावर पुस्तक प्रकाशित करण्याचा मान मिळवणारा हा महाविद्यालयाचा प्रथम विद्यार्थी आहे. आजपर्यंत महाविद्यालयामध्ये अनेकान्त वार्षिक नियतकालिक तसेच अनेकान्त ह्युमॅनिटीज जर्नल मध्ये सर्वेश गोसावी याचे विविध लेख प्रकाशित झाले आहेत. यातूनच पुस्तक लिखाणाची प्रेरणा सर्वेश गोसावी यास मिळाली असे त्याने नमूद केले.

महाविद्यालयात स्वतंत्र सेंटर फॉर इनोवेटीव्ह अँण्ड रिसर्च सेल (सीआयएआर) ची स्थापना केली आहे. तसेच विद्यार्थ्यांना रिसर्च करिता आर्थिक सहाय्य देखील केले जाते. ब-याच विद्यार्थ्यांना याचा फायदा होत आहे. सर्वेश गोसावी याच्या या आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रकाशनाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी विशेष अभिनंदन केले आहे व भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

---

रणशिंग दि. १३/१२/२०१८ पा.नं. १५


अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**

Phone : 02112-222405, 223625

**सेवक गणवेशासाठी निविदा सूचना**

१. आमच्या महाविद्यालयीन सेवकांच्या गणवेशासाठी (शर्ट-पॅंट) कापड पुरवठादारांकडून ४५० मीटर टेरिकॉट कापडासाठी मोहर बंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांत कापडाच्या नमुन्यासह दरपत्रके पाठवून द्यावीत.

२. वरील ४५० मीटर कापडाचे ८४ गणवेश शिवावयाचे आहेत. तरी इच्छूक टेलर्संनी ५ दिवसांत स्वतंत्रपणे दरपत्रके त्वरीत पाठवून द्यावीत.

उपरोक्त दोन्ही प्रकारची दरपत्रके स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा हक्क महाविद्यालयाने आपणांकडे राखून ठेवला आहे.

**प्राचार्य**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती


ABS
15/3/19

मा. प्राचार्यसाहेब

2018

दै सकाळ दि. १५/१२/२०१८ पान नं. ६ (पुणे)

सकाळ 15/12 पान-पुणे-6

# टी. सी. महाविद्यालयात विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे

**बारामती शहर, ता. १४** : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आणि थांग-ता असोसिएशन यांच्यातर्फे खासदार सुप्रिया सुळे यांच्या पुढाकारातून दोनदिवसीय 'महिला स्व-संरक्षण कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यशाळेत ३६२ विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळेत थांग-ता स्वसंरक्षणाचे हँड टेक्निक्स; तसेच मनाचे धैर्य व आत्मविश्वास वाढविण्यासाठीचे तंत्र शिकविण्यात आले. थांग-ता मार्शल आर्ट महाराष्ट्रात सात हजार मुलींपर्यंत हा खेळ पोचलेला आहे. ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशनचे सचिव महावीर धुलकर यांनी विद्यार्थिनींना अनेक तंत्रकौशल्ये शिकविली. मनोज कांडकर, माधुरी कुलकर्णी, साईश्वरी आणेकर, प्राची पवार या विविध जिल्हा प्रशिक्षकांनी विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. रंजना नेमाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली माळी यांनी आभार मानले. राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्ष वनिता बनकर, नितीन सातव यांनी संयोजन केले.

दै लोकसत्ता दि १५/१२/२०१८ पान नं. २ (पुणे)

लोकसत्ता 15/12 पान-पुणे 2

# विद्यापीठाच्या पाच विद्यार्थ्यांची प्रजासत्ताकदिन संचलनासाठी निवड

**प्रतिनिधी, पुणे**

**सावित्रीबाई फुले** पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील पाच स्वयंसेवक विद्यार्थ्यांची नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताकदिनाच्या संचलनासाठी निवड झाली. महाराष्ट्राच्या १४ जणांच्या संघामध्ये सर्वाधिक पाच विद्यार्थी विद्यापीठाचे आहेत.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी ही माहिती दिली. प्रशांत निकम (रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी), अक्षय जगदाळे (विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती), पुष्पक जगताप (एनव्हीपी महाविद्यालय, लासलगाव, नाशिक), पूजा पेटकर (एकनाथ सीताराम दिवेकर कॉलेज, वरवंड) आणि दर्पेश डिंगर (सिंहगड इन्स्टिट्यूट, नऱ्हे) अशी या विद्यार्थ्यांची नावे आहेत. या विद्यार्थ्यांसह प्रा. रवींद्र अहिरे (केजीडीएम महाविद्यालय, निफाड) हे महाराष्ट्र आणि गोवा राज्याचे संघप्रतिनिधी सहभागी होतील.

'शिबिरातून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडलेल्या एकूण १४ विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाचे पाच विद्यार्थी सहभागी होत आहेत, ही विद्यापीठासाठी गौरवास्पद बाब आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थीकेंद्री धोरणासह विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे हे यश आहे,' असे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

ADS
15/12
...aturchand College
* Baramati *